संगीता जोशी

# अमूल्यकथा



# अमूल्यकथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अमूल्यकथा

संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# अमूल्यकथा

संगीता जोशी

A-1. भूषण अपार्टमेंट.

11/2. कर्वेनगर. कमिन्स कॉलेजजवळ. पुणे 411052

Phone : 9665095653. 7722006363

sanjoshi729@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary. dramatic. musical. sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १० ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संगीता जोशी



ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रसिद्ध होणारे संगीता जोशी यांचे हे नववे पुस्तक.

सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या मराठी गझलकार. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका. वेदना संवेदना. चांदणे उन्हातले. मराठी गझल. नजराणा शायरीचा भाग १ व २. ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा. मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका. ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत.

या सर्व सन्मानांमध्ये गुंतून न रहाता त्यांचा लेखनप्रवास सुरूच आहे. आणि त्यासाठी त्या नवनवीन माध्यमांचा मागोवा घेत असतात.

त्यांच्या विविध नियतकालिकांतून अनेक स्फ़ुटकथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचे संकलन करून ई साहित्यतर्फ़े मूल्यकथा १ व २ प्रकाशित होत आहेत. त्यानंतरही संगीता जोशी यांच्याकडून भरपूर लेखनाची अपेक्षा आहे आणि त्या ती पूर्ण करतीलच.

# संगीता जोशी यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ye_chamanajar_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_2_sangeeta_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ney_kuthehi_vadala_sangeeta_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mddb_dattopant_deshpande. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/bsbb_sangeeta_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/gajhalaayan_sangita_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mulyakatha_1_sangeeta_joshi. pdf






नेऽ कुठेही
वादळा
– संगीता जोशी


उर्दू शायरीचा आस्वाद
भाग १
संगीता जोशी


उर्दू शायरीचा आस्वाद
भाग २
संगीता जोशी


संगीता जोशी
बिछडे
सभी
बारी बारी
कैफ़ी
फ़िराक़
साहीर


संगीता जोशी
चमनजार


संगीता जोशी

# अमूल्यकथानुक्रम


1. कल्पना चावला
2. परोपकार
3. ऋषी भरद्वाज
4. प्रार्थनेची ताकद
5. एका डॉक्टरची गोष्ट
6. गौतम बुद्ध व अंगुलिमाल
7. दांडी-यात्रा
8. वर्धमान महावीर
9. रामानुजन्—
10. खुदीराम बोस
11. एक ग्रंथ आणि दोन मित्र
12. कृतज्ञता
13. शहीद उधमसिंह
14. स्वामी विवेकानंद
15. धौम्य ऋषि व शिष्य आरुणी
16. तेवीस मार्च—बलिदानाचे स्मरण
17. किशोरी शास्त्रज्ञ—हेतल वैष्णव
18. सेवा व्रत
19. मोठ्यांचे मोठेपण कशात असते ?
20. एक लघु-चित्रपट
21. महात्मा गांधीजी
22. पाण्यासाठी दाहि दिशा.
23. महान पराक्रमी शिवाजी
24. सर्कसवाले देवल

# मूल्यकथा—मुलांसाठी (.... खरं तर सर्वांसाठी)

मनोगत---

आजकाल. समाजात. देशात सर्व ठिकाणी मूल्यांचा ऱ्हास झाल्याचे आपल्या सर्वांच्या अनुभवाला येते. आपण हळहळतो. सगळी जबाबादारी शाळेतील शिक्षकांवर आहे असे समजतो. शालेय वयातच ही मूल्ये मुलांच्या मनात रुजविली पाहिजेत. हे सत्य आहे. मात्र शिक्षकांच्या जबाबदाऱ्या वाढल्यामुळे त्यांना कामाचा इतका ताण असतो की यासाठी वेगळा वेळच नसतो. अभ्यासक्रमाला जोडूनच त्यातून काही मूल्ये रुजवावीत अशी क्षमता सर्व शिक्षकांकडे नसतेही. सुटीतही कामेच असल्याने मूल्ये रुजतील अशा गोष्टी शोधणेही शक्य होत नाही. मीही शिक्षिका होते. या सर्वातून मी गेलेली आहे. इच्छा असूनही ते जमले नाही.

निवृत्त झाल्यावर दीर्घ काळानंतर मला संधी मिळाली. 'बाल विकास' हे मुंबईतून व 'सनातन सारथी' हे पुण्यातून अनुक्रमे इंग्रजी व मराठीतून प्रसिद्ध होणारी मासिके आहेत. यात मला बालविकाससाठी लिहायला सांगितले गेले . मला आनंदच झाला. गेली पाच-सहा वर्षे मी हे काम करत आहे. ही मासिके. श्री सत्यसाई बाबा यांच्या प्रेरणेने गेली चाळीस वर्षे निघतात. मात्र ती सर्वत्र उपलब्ध नसतात म्हणून श्री सुनीलजी सामंत व त्यांच्या ई-साहित्य प्रतिष्ठान टीम द्वारे पुस्तक रूपाने महाजालांकित व्हावीत असे सुनीलजींनी सुचविले. त्यांच्यामुळेच या कथांना चिर-जीवन मिळत आहे.

मी या कथा लिहिल्या असे म्हणणेही पूर्णपणे सत्य नाही. या कथांचे स्रोत विविध आहेत. कधी एखादे पुस्तक. कधी वर्तमानपत्रातील बातमी. कात्रणे. कुठे ऐकलेले भाषण. तर कधी एखादी पाहिलेली फिल्म! एखाद्या कोणत्या ठिकाणी असे बीज मिळेल की त्यातून मुलांना काही मूल्य नकळत शिकवता येईल. या वृत्तीने माझी शोधक नजर असायची व सतत असते. 6 वर्षे ते 15-16 वर्षे हा वयोगट डोळ्यांसमोर ठेवून मी लिहीत गेले.

या कथांमध्ये मीच इतकी गुंतून गेले की हे सर्व लिहितांना मी कधी मनातच हसले किंवा कधी अश्रूही तरळले. आगगाडीतून जातांना आपला एकच राहिलेला बूट फेकणाऱ्या मुलाची गोष्ट वाचून माझा कंठ आत्ताही दाटून येतो. जावेद च्या कथेत शेवटी होणाऱ्या उलगड्यात मला आजही अनामिक समाधान मिळते! ऊधमसिंहाबद्दल लिहितांना तेव्हाही माझी लेखणी थरथरली! फाशी गेलेल्या त्या कोवळया तरुणासाठी आजही डोळे भरून येतात. रत्ना या नोकराला क्षमा मिळाली या शेवटात मनाला शांती मिळते. अब्बुखां च्या बकरीला उचलून कुरवाळावेसे वाटते..... मनाच्या अशा किती प्रतिक्रिया लिहू?... खूप लिहिता येईल. पण थांबायला हवेच.

या गोष्टी मुलांना 'सांगितल्या' तर त्या अधिक आवडतात असा अनुभव आहे. थोडे नाट्यीकरण. हावभाव करून सांगता आले तर फारच छान! हल्लीची समजदार मुले कॉम्प्यूटरवरही वाचू शकतील! पालकांनी या गोष्टी स्वतःही वाचाव्यात; कारण शाळा-कॉलेज सोडल्यावर आपण फार कमी वाचतो. पालकांनी जर अंगी गुण बाणवले तर मुलंही त्यांचं अनुकरण करतील. या पुस्तकामुळे मोठ्यांना दिशा मिळेल. मुलांना अधिक चांगलं वाढवता येईल. असा विश्वास मला वाटतो.

श्री सत्यसाई बालविकास वर्ग ठिकठिकाणी चालू असतात. अगदी परदेशातसुद्धा! पुण्या-मुंबईत तर विविध ठिकाणी आहेत. शोध घेतला तर मिळतील. वरील वयोगटासाठी. यात व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रयत्न व मूल्याधारित शिक्षण दिले जाते. अशा वर्गात पालक गुरु म्हणूनही सहभागी होऊ शकतात. त्यासाठी प्रशिक्षणही दिले जाते.

तुम्हाला ह्या कथा कशा वाटल्या. मुलांना म्हणजे मुलींनाही कशा वाटल्या. तुमचे अनुभव कळविले तर आनंद होईल.

श्री सुनील सामंत व ई-साहित्य प्रतिष्ठानचे आभार मानून थांबते.

------संगीता जोशी

# कल्पना चावला

मित्रांनो. तुम्हाला आकाशातले तारे. चंद्र. चांदण्या बघायला आवडतात का? आवडत असणारच. आकाश कसं गूढ वाटतं ना? तशाच उत्सुकतेपोटी मानव चंद्रावर जाऊनही आला! तुम्हाला कोणी विचारलं की तुम्हाला चंद्रावर . किंवा आता मंगळावर जायची तुमची तयारी आहे का?---तर तुम्ही नक्कीच 'होऽऽ' म्हणाल.

अशीच एक मुलगी होती कल्पना चावला. तिला आकाश. तारे यांच्याबद्दल फार कुतूहल वाटायचं. आकाशात उडणारी विमानं बघायला आवडायची. 'एक दिवस मी पण विमान उडवणार' असं ती मनात म्हणायची. घरची आर्थिक परिस्थिती फारशी बरी नव्हती. आपल्या ह्या हुषार मुलीची इच्छा आपण कशी पुरी करू शकू. अशी चिंता तिच्या आईवडिलांना वाटायची. सर्व टप्पे पार करत कल्पनाने एरॉनॉटिकल इंजिनियरिंगची ( विमान अभियांत्रिकीची ) फायनल परीक्षा प्रथम श्रेणीत व पहिल्या नंबराने पास केली. चंदीगडच्या कॉलेजात तिच्या वर्गात ती एकटीच मुलगी होती! तिला उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जायचे होते. तिला शिष्यवृत्तीही मिळाली व ती युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास येथे दाखल झाली. त्याकाळी नातेवाईकांनी व इतरांनीही कल्पनाच्या आईला खूप नावे ठेवली. मुलींना परदेशी पाठवून शिक्षण देण्याची काय गरज? मुलीवर इतका खर्च कशाला करायचा. असा त्यांचा प्रश्न होता. पण कल्पनाला तिच्या आईचा पूर्ण पाठिंबा होता. मुलगा-मुलगी असा भेद आई करत नव्हती.

एवढे शिक्षण घेऊनही कल्पना थांबली नाही. 1988 साली तिने कोलोरॅडो (अमेरिका) विद्यापीठाची डॉक्टरेट मिळविली. विमान-अवकाश-तंत्रज्ञान हा तिचा अभ्यासाचा विषय होता. पुढे तिने सॅनफ्रॅन्सिस्को येथे विमान चालवण्याचे प्रशिक्षण घेतले आणि मनाशी ठरविलेले ध्येय पूर्ण केले.

याच वर्षी तिने अमेरिकेतील प्रसिद्ध संस्था 'नासा' (NASA- National Aronautics Space Centre) येथे काम करण्यास सुरवात केली. ही संस्था अंतराळविषयक मोहीम. संशोधन. अवकाश संशोधन याविषयक काम करते. अपोलो-11 या रॉकेटने चांद्रयान नेले होते व नील आर्मस्ट्रॉंग हा पहिला मानव चंद्रावर उतरला होता. हे तुम्हा सर्वांना माहीतच असेल. ती मोहीम नासानेच राबविली होती. नासामध्ये अवकाश-यात्रींच्या प्रशिक्षणासाठी कल्पनाची

निवड झाली. 2962 जणांची परीक्षा घेतली होती; त्यातून फक्त एकोणीस जणांची निवड केली गेली; त्यात कल्पना होती!

पुढे 2003 मध्ये कोलंबिया या यानाच्या मोहिमेत कल्पना चावला हिचा समावेश करण्यात आला. ह्या यानाचे हे 28 वे उड्डाण होते. यात कल्पनासह एकूण सात अवकाशयात्री होते. या मोहिमेत अवकाशात एकूण 80 प्रयोग करण्यात येणार होते. ते सर्व वैद्यक क्षेत्रासंबंधी होते. वेळोवेळी ही माहिती अवकाशातून पृथ्वीवर पाठविली जात असते. अशा संशोधनाचा फायदा संपूर्ण मानवजातीला होत असतो. दूरदर्शन. मोबाईल. टी. व्ही. इत्यादि सुविधा यानांनी सोडलेल्या उपग्रहामुळेच शक्य होतात. याशिवाय. पृथ्वीचे व इतर नकाशे काढणे. जलमार्ग. विमानमार्ग निश्चित करणे. ओझोन थराचा अभ्यास करणे अशी कितीतरी माहिती मिळविण्यासाठी अवकाश-मोहिमा काढल्या जातात. विविध वादळे व समुद्रप्रवाहांचाही अभ्यास केला जातो.

अवकाश मोहिमेत समावेश केली गेलेली कल्पना ही दुसरी भारतीय व्यक्ती होती. राकेश शर्मा या भारतीयाने ‘सोयूझ’ या रशियन यानातून अवकाश प्रवास केला होता.

कोलंबियाने 16 जानेवारी 2003 रोजी अवकाशात झेप घेतली. कामगिरी फत्ते करून ती माहिती पृथ्वीवर पाठविली देखील. 16 दिवसांची सफर पूर्ण करून 1 फेब्रुवारी 2003 ला हे यान परत पृथ्वीवर पोहोचणार होते. पण काय गडबड झाली माहीत नाही; पोहोचण्याच्या केवळ सोळा मिनिटे आधी यानाने पेट घेतला व स्फोट होऊन यानाचे तुकडे तुकडे झाले.... सर्व अंतराळवीरांचा दुःखद अंत झाला. कल्पना ही अंतराळ-कन्या अंतराळातच विलीन झाली!!

मित्रांनो. तिची आज खास आठवण येण्याचे कारण म्हणजे आठ मार्चला येणारा महिला दिन! महिला ज्यात नाहीत. असे आज कोणतेही क्षेत्र उरलेले नाही. नातेवाईकांनी नावे ठेवली तरी कल्पनाच्या आईवडिलांनी तिला वेगळ्या वाटेने जाण्याची संधी दिली. तिला पाठींबा दिला. याचे तिने अक्षरशः सोने केले. कोलंबियाच्या 27 सफरी यशस्वी झाल्या होत्या. दुर्दैवाने 28 व्या सफरीला हे यान दुर्घटनाग्रस्त झाले. पण कल्पनाची कामगिरी यशस्वीच होती. तिची आई ही तिची पहिली गुरु होती. त्यांचेही विशेष कौतुक वाटायला हवे. 1 जुलै 1961 ला जन्मलेल्या कल्पनाला घरून एवढे प्रोत्साहन मिळणे ही त्या काळात विशेषच गोष्ट होती! तिने जिद्दीने आपल्या ध्येयाचा पाठपुरावा केला. हे महत्त्वाचे. मुलगी आहे. म्हणून मी अमुक एक गोष्ट करू शकणार नाही हे तिला मुळी मान्यच नव्हते. म्हणूनच ती यशाचे शिखर गाठू शकली. तिला

वाचनाचाही खूप छंद होता. विशेषतः ती थोर पुरुषांची चरित्रे वाचायची. त्यांच्या जीवनसंघर्षातून आपल्या प्रेरणा मिळते. असे तिचे मत होते.

आपणही मुलगा-मुलगी हा लिंगभेद मनातून काढून टाकला पाहिजे. मुलांनो. आई हा तुमचा पहिला गुरु असतो व आई ही देवापेक्षाही श्रेष्ठ आहे ही आपल्या बाबांची शिकवण तुम्ही नेहमी लक्षात ठेवा. तुम्ही मोठे झाल्यावर आई-वडिलांचा नीट सांभाळ करा. त्यांना कष्ट देऊ नका.

ध्येय साध्य करण्यासाठी तुमच्या मनाचा निश्चय हीच मोठी ऊर्जा असते. मग आर्थिक अडचणी. लोकांचा विरोध इ. अडथळे आपोआप दूर होतात. तसेच नेहमी वाचन करा. वाचाल तर वाचाल. या वाक्याचा अर्थ माहीत आहे ना? नसेल तर घरी मोठ्या माणसांना विचारा किंवा बालविकास गुरूला विचारा.

मुलांनो. तुमच्या बहिणीसुद्धा तुमच्याइतक्याच हुषार असतात. सक्षम असतात हे नेहमी लक्षात असू द्या.

# परोपकार

सुमारे पाचशे वर्षांपूर्वी रहीम नावाचे एक संत होऊन गेले. व्रजभाषा आणि खडी बोली(हिंदी) या भाषेत लिहिलेले त्यांचे दोहे आजही वाचले जातात. दोहे म्हणजे फक्त दोन ओळीची कविताच असते. त्यात जीवनविषयक तत्त्वज्ञान. चांगला उपदेश. जगावे कसे इ. गोष्टी खुबीने सांगितलेल्या असतात. रहीमचा एक दोहा असा आहे--

तरुवर फल नहि खात है. सरवर पियहि न पान
कहे रहीम परकाजहित. संपति सचहि सुजान ।।

याचा सरळ अर्थ आहे की वृक्ष आपली फळे स्वतः खात नाहीत; व सरोवर. तळीसुद्धा आपले पाणी स्वतःच पीत नाहीत. त्यांची फळे व पाणी हे दुसऱ्यांच्याच उपयोगासाठी असते. तसेच सज्जन. सुजन लोकांची संपत्ती ही दुसऱ्यांच्या उपयोगासाठी ते खर्च करतात. आपल्याला जे काही मिळालं आहे ते आपल्यासाठी नाहीच; ते दुसऱ्याच्या कामी आलं तरच त्याचा योग्य वापर झाला असे होईल. अशीच त्यांची धारणा असते. म्हणूनच तर त्यांना सज्जन म्हणायचे!

झाडाची फळे. माणूस. इतर प्राणी. पशुपक्षी. सगळेच खातात. नद्या. तळी यांचे पाणी सर्वांची तहान भागवतात. याप्रमाणेच सृष्टीत जे काही आहे ते दुसऱ्याच्या सेवेसाठी असतं. पर्वत भूभागाचे संरक्षण करतात; सूर्य सृष्टीला प्रकाश व झाडांना अन्न बनविण्यास ऊर्जा देतो. सूर्यामुळे सागराचे खारे पाणी गोडे होते; ढग पाण्याची वाफ योग्य ठिकाणी वाहून नेतात व पाऊस पाडतात. तो वेळेवर नाही आला तर काय संकट ओढवते सर्वांना चांगले माहीत आहे. सृष्टीचे सर्व घटक असे एकमेकांना पूरक कामे करतात. उपयोगी पडतात.

निसर्गातीलच नव्हे तर मानवनिर्मित उपकरणेही मानव जातीची सेवाच करतात. पंख्याचे उदाहरण घ्या. इतरांना सुखद वारा देण्यासाठी तो फिरतो. चाक स्वतःसाठी नाही तर गाडी चालावी म्हणून. किंवा कारखान्यातील मशीन चालावे म्हणून फिरते. फ्रीझ. पदार्थ टिकवून ठेवतो. पाणी गार करतो; मायक्रोवेव्ह पदार्थ झटपट बनवतो. गरम करतो. आपला वेळ

वाचवतो. ही व अशी अन्य उपकरणे माणसाची सेवाच करत असतात. तुम्ही विचार केला तर आणखी कितीतरी उदाहरणे तुम्हाला सापडतील.

आपण एकमेकांच्या उपयोगी पडण्यासाठी. सहकार्यासाठी आहोत. आपल्या जीवनाचा उद्देश्यच इतरांची सेवा करणे हा आहे; ही गोष्ट आदिमानवाने पूर्वीच जाणली होती. म्हणून तर त्याने समाज बनविला! नाहीतर ‘समाज’ बनविण्याचं कारणच काय होतं? मात्र तीच गोष्ट माणूस आज विसरून गेला आहे. आज. दुसऱ्याची सेवा करणं तर दूरच. माणूस फक्त स्वार्थी बनला आहे. तो केवळ स्वतःचा. स्वतःच्या फायद्याचा विचार करतो. ही फार वाईट गोष्ट आहे. म्हणून संत सतत योग्य मार्ग दाखवत असतात.

काही भक्त स्वामींना म्हणायचे. ‘स्वामी. तुम्ही तुमच्या मागल्या प्रवचनातही अमुक अमुक गोष्ट सांगितली होती. तुम्ही पुन्हा पुन्हा तोच उपदेश का करतां?’

स्वामींचे उत्तर असे. ‘ मी खूप वेळा एखादी गोष्ट सांगतो; पण तू तुझे आचरण त्याप्रमाणे बदललेस का? नाही ना ? म्हणूनच मला सारखे सांगावे लागते. ’

स्वामींच्या म्हणण्याचा अर्थ लक्षात आला ना? आपण स्वार्थ सोडून इतरांची खऱ्या अर्थाने निरपेक्ष सेवा केली पाहिजे. आपण फळे खातो म्हणून वृक्ष आपल्याकडे काही मागत नाही. नदीचे पाणी पितो म्हणून नदीही काही मागत नाही. भगवान बाबा म्हणतात. हवा. त्यातला ऑक्सिजन सर्वांना मिळत आहे; त्याचे आपल्याला पैसे मोजावे लागतात का? मग माणूस निरपेक्ष सेवा का करू शकत नाही? करायलाच हवी.

संत रहीम तेच सांगत आहेत. आपण जे विसरलो आहे त्याची आठवण निसर्ग आपल्याला करून देत आहे. तसे आपण वागायला हवे. माणसाने स्वतःत परिवर्तन घडवायला हवे.

रहीम यांचे वडील बादशहा अकबराचे गुरु होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूनंतर रहीम अकबराच्या शाही परिवारातच लहानाचा मोठे झाले. ते कृष्णभक्त होते. राजवाड्यात राहूनही त्यांचे विचार मानवाचे कल्याण व जीवनाच्या तत्त्वज्ञाना भोवतीच फिरत राहिले. 1627 मध्ये आग्रा इथे त्यांचा मृत्यू झाला. त्यांची कबर दिल्ली येथे आहे.

# ऋषी भरद्वाज

मागील अंकात आपण ऋषींबद्दल जाणून घेतलं. यावेळी ऋषी भरद्वाज यांच्याबद्दल थोडी अधिक माहिती घेऊ. आपल्याला माहीतच आहे की आपले गुरु श्री सत्यसाईबाबा हे भारद्वाज गोत्रात जन्माला आले होते. गोत्र म्हणजे कुल. आपण वंश सुद्धा म्हणू शकतो. भरद्वाज ऋषी हे महर्षि अंगिरा (अंगिरस) यांचे नातू. अंगिरा हे ब्रह्माचे मानस पुत्र असून ते महर्षि होते. अंगिरसांचे पुत्र बृहस्पती व बृहस्पतीं चे पुत्र भरद्वाज. भरद्वाज ऋषींपासून वंश सुरू होतो व त्या वंशातील सर्वांना भारद्वाज म्हटले जाते. भारद्वाज गोत्र हे सर्वात अधिक उत्कर्षित गोत्र समजले जाते.

भरद्वाज ऋषी हे ज्ञानाचे उपासक होते. वेदांतील ज्ञानाची त्यांना तृष्णा (तहान) होती. त्यामुळे त्यांनी इंद्रदेवाची आराधना केली. ध्यान केले. इन्द्राने प्रसन्न होऊन त्यांना सावित्राग्नि विद्या प्रदान केली; ज्यामुळे ज्ञानग्रहण करणे सोपे होते. या विद्येमुळे वेदातील शब्द व ऋचा (श्लोक) यांचा अर्थ भरद्वाज ऋषींना समजून घेता आला. वेदांचा अभ्यास पुरा करता यावा यासाठी इंद्राने त्यांना शंभर-शंभर वर्षांच्या तीन जन्मांचे वरदान दिले. वेदाभ्यासाशिवाय त्यांना इतर कशाचीच इच्छा नव्हती. वेदांमधील सूक्ष्म ज्ञान जाणून घेण्याच्या उद्देशाने भरद्वाजांनी शिव आणि शक्ती या दोघांचीही दीर्घ उपासना केली होती.

इन्द्राने नंतर भरद्वाजांना सांगितले की 'तुमच्या ज्ञानाचा उपयोग समाजाला झाला पाहिजे. ज्ञान हे एकाजवळच राहून चालत नाही;ते प्रवाही असले पाहिजे. '

पण भरद्वाज आपली तपस्या सोडायला तयार नव्हते. मात्र इन्द्राने आज्ञा केल्यावर त्यांनी ती मान्य केली व ते समाजात वावरू लागले. त्यांनी वेदांची शिकवण लोकांना दिली. सात्विक आचार-विचारांचे महत्त्व पटविले. लोकांना जनावरांवरही प्रेम करायला शिकविले. गायीला गोमाता मानून तिची सेवा करणे हा पुण्याचा मार्ग आहे. हे त्यांनी लोकांना सांगितले. जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांना शिक्षित करण्यावर त्यांचा जास्त भर होता.

भरद्वाजांच्या आईचे नाव ममता होते; पिता बृहस्पती हे वर आलेच आहे. बृहती म्हणजे वाणी; म्हणजेच बोलण्याची क्षमता. बृहस्पतीनी शुद्ध वाणीचे महत्त्व सांगितले आहे.

आपण आपल्या प्रत्येक शरीर-अवयवांची एक एक देवता मानली आहे. उदा. दृष्टीची देवता सूर्य. मनाची देवता चंद्र. तशीच वाणीची देवता अंभृणी होय.

ऋग्वेदातील बरीच सूक्ते वसिष्ठ ऋषींना स्फुरली आहेत. त्या खालोखाल सूक्तांची रचना भरद्वाजांनी केली आहे. त्यांचा दुसरा क्रमांक लागतो. इतर महर्षींनी केलेल्या रचनांपेक्षा त्यांनी रचलेल्या सूक्तांची संख्या सर्वात जास्त आहे.

भरद्वाज ऋषी विवाहित होते. त्यांची एक पत्नी सुशीला. त्या दोघांच्या पुत्राचे नाव गर्ग ऋषी. त्याकाळी एकापेक्षा अधिक विवाह करण्याची प्रथा होती. भरद्वाज व अप्सरा घृताची यांचा पुत्र हेच द्रोण ऋषी. द्रोणाचार्य. जे पुढे कौरव-पांडवांच्या पदरी शिक्षक व गुरु

म्हणून होते. स्वतः भरद्वाज हे युद्धकला व युद्धशास्त्र यात निपुण होते; तसेच व्याकरण शास्त्रातही अधिकारी होते. त्यांनी सर्व विद्या द्रोण ऋषींना शिकविल्या होत्या व द्रोण युद्धनिपुण झाले होते. त्यामुळेच ते महाभारतीय युद्धात सेनापती ही झाले होते.

भरद्वाजांना दोन मुलीही होत्या. पहिली देववर्णिनी. दुसरी कात्यायनी. दुसरीचा विवाह याज्ञ्यवल्क्य ऋषींबरोबर झाला होता. अशा प्रकारे भरद्वाज ऋषींचे पारिवारिक जीवन समृद्ध होते.

समाजाच्या कानाकोपऱ्यात जाऊन भरद्वाज ऋषींनी ज्ञानाचा प्रचार केला. सद्‌गुणांचे महत्त्व सांगितले व संस्कार केले. जंगलातील आदिवासींनाही त्यांनी शिक्षित केले. त्याकाळी जाति-पाती भेदभाव नव्हते. कोण काय काम करते यावर गट ठरत. उदा. युद्ध करणारे ते क्षत्रीय. ज्ञान देणारे ते ब्राह्मण व्यापार करणारे वैश्य व सेवा करणारे शूद्र. द्रोणांचे उदाहरण घेतल्यास ते ज्ञान देण्या बरोबरच युद्धनिपुण होते. कौरवांची त्यांनी नोकरी म्हणजे सेवाही केली. म्हणजे ते एकाच वेळी क्षत्रीय. ब्राह्मण व शूद्र होते! त्यांच्या पित्याने व त्यांनी आदिवासींनाही शिकविले. एकलव्याचा अंगठा कापून घेतला या कथेचा आज फार जातीय दुरुपयोग केला जातो. तो सर्वस्वी चुकीचा आहे. आपली विद्या मी कौरव-पांडवांखेरीज कोणालाही देणार नाही. असा त्यांनी कौरवांशी करार केला होता. (आजही एका कंपनीने केलेले एखादे सॉफ्टवेअर वा प्रोग्राम जर दुसऱ्या कंपनीला विकला तर पहिली कंपनी आपल्या एम्प्लॉयीला फसवणूक केली या मुद्यावरून काढून टाकेल की नाही?) अर्जुनापेक्षा कोणीही वरचढ होऊ देणार नाही अशी त्यांची

प्रतिज्ञा होती. त्यापोटी त्यांनी ते केले. आज त्याचा विपरीत अर्थ काढण्याचा अधिकार आपल्याला पोचत नाही. ते लोक महान होते. त्यांना चुकीचे/बरोबर ठरविण्याची आपली पात्रता नाही. इतके म्हणून हा विषय सोडून देऊ.

वाल्मिली ऋषींनी एकदा क्रौंच पक्ष्याचे एक जोडपे पाहिले. तेवढ्यात एका पारध्याने त्या जोडीतील एकाला बाण मारला व तो पक्षी मेला. तेव्हा वाल्मिकी ऋषींच्या तोंडून अनुष्टुभ् छंदातील एक श्लोक बाहेर पडला. ते पहिले काव्य मानले जाते. या प्रसांगाचा एकमेव साक्षीदार भारद्वाज ऋषीच होते. हा एक महत्त्वाचा योगायोग!

मित्रांनो. आपले बाबा श्री सत्यसाईबाबा. यांनी याच कुळात का जन्म घेतला. ते स्वतः शिव-शक्ति अवतार होते. त्यांनीही प्राण्यांवर प्रेम करायला शिकविले. स्वतः हत्ती पाळून प्राणिप्रेम दाखवून दिले. गो-शाला बांधून गायीची सेवा दाखवून दिली. वेद शिकण्यावर भर दिला. याचा संदर्भ आता तुम्हाला समजला असेल. होय ना?

# प्रार्थनेची ताकद

मित्रांनो. मुंबईतील प्रख्यात हृदयरोग-तज्ज्ञ डॉ. नितू मांडके यांचे नाव कदाचित् तुमच्या कानांवर आले असेल. दुर्दैवाने ते आता आपल्यात नाहीत. हा त्यांच्याच बाबतीत घडलेला एक प्रसंग आहे. डॉक्टरांनी हजारो हृदयरोग्यांची ऑपरेशन्स केली होती व त्यांना जीवदान दिले होते. त्यांना खूप पुरस्कार. सन्मान मिळाले होते. असाच एक बडा पुरस्कार घेण्यासाठी त्यांना मुंबईबाहेर जायचे होते. कार-ड्रायव्हिंगची अत्यंत आवड असल्याने आपली मोठी कार ते स्वतःच चालवत निघाले होते. ऑपरेशन्स संपवून निघता निघता बराच उशीर झाला होता. ते मुंबईबाहेर पडले पण थोड्याच वेळात वातावरणाचा रंग चांगलाच बदलला. एकदम काळेकुट्ट ढग आकाशात जमा झाले; विजा चमकू लागल्या व काही क्षणातच जोरदार पाऊस सुरू झाला. त्याचे रूपच असे होते की कमी होईल अशी चिन्हे नव्हती. हेड-लाईट लावून जोरात वायपर्स चालविले तरी समोरचे स्पष्ट दिसत नव्हते. तरीही कमी वेगाने डॉक्टर पुढे जातच राहिले. काही वेळ पुढे गेल्यावर गाडीला हिसके बसल्यामुळे त्यांना कळले की आपण मुख्य रस्ता सोडून कुठेतरी कच्च्या रस्त्यावर आलो आहोत. काय करावे हे न समजल्यामुळे ते तसेच पुढे जात राहिले. आता पुरस्कारासाठी जाऊ शकणार नाही. हे त्यांना कळून चुकले होते. त्या काळी मोबाईल्स ही नव्हते!

थोडे आणखी दूर गेल्यावर त्यांना काही मिणमिणते दिवे दिसले. पहिल्याच झोपडीवजा घरापाशी ते थांबले. कारण तशाच पावसात पुढे जाणे शहाणपणाचे नव्हते. आत गेल्यावर एक बाई व तिचे लहान मूल तिथे रहात असल्याचे कळले. माणुसकी असल्याने त्या बाईने डॉक्टरांना बसायला कांबळी दिली. कोरा चहा चालेल का विचारले. कारण दूध नव्हतेच. मूल सारखे रडत होते. तरी तिने चहा आणून दिला.

मुलाला शांत केल्यावर ती म्हणाली. ‘ मी देवाला दिवा लावते आन् प्रारतना करते. आज तुमी बी करा माज्यासंगं’

डॉक्टर मनात म्हणाले. ‘आता हिला कसं सांगणार की मी देव-बीव मानत नाही ? त्यापेक्षा हात जोडलेले बरे!’ तिनं हात जोडून मनोभावे आपल्या मुलाला बरं करण्याची देवाला विनंती केली.

डॉक्टरांनी विचारले.   'ह्याला बरं नाहीए का ?'

ती म्हणाली.  ' याला जलमल्यापास्नंच रुदयाला भोक हाए. गावातले डागदर म्हनत्यात तेचा विलाज फकस्त मुंबईला व्हईन. कोन मानके म्हून लई हुशार डागदर हाए म्हनं. त्येच त्याला बरं करतीन.  म्हने. पर पैका कुठाय माजंपाशी ? मी द्येवालाच साकडं घालते याला बरं कर म्हनून. तो ऐकंल तवा ऐकंल! रोज प्रार्तना करायची ती करते मी. '

हे ऐकून डॉक्टर मनातल्या मनात सर्द झाले. त्यांना कळेना आज आपण रस्ता चुकून नेमके ह्याच घरात कसे आलो? हिच्या देवानेच तर हिची प्रार्थना ऐकली नसेल?

थोडा वेळ तसाच गेला. पाऊस कमी झाला होता. पण अंधार व कच्चा रस्ता. डॉक्टरांनी त्या बाईला सांगितले.

'बाई.  जरा उजाडलं की माझ्याबरोबर मुंबईला चला मुलाला घेऊन. तुमच्या शेजारणीला पण घ्या सोबत. तिथं तुमच्या मुलावर उपचार करू. '

'पन मी कशी येनार? पैकं न्हाइत नं '

'बाई.  काळजी सोडा. मीच डॉक्टर मांडके. मीच हृदयाची ऑपरेशन्स करतो. मी बरं करीन तुमच्या मुलाला. मला एकही पैसा देऊ नका. फक्त मुलाला घेऊन चला. बाकीचं मी बघतो. तुमची प्रार्थना देवाने ऐकली असं समजा! '

बाईनं डॉक्टरांच्या पायाशी लोळण घेतली. तिच्या डोळयातून अश्रू वाहात होते. ती वळून त्या देवाच्या तस्बिरीकडे वळली; तस्बीर हातात घेऊन तिचे मुके घेऊ लागली. साक्षात डॉक्टरांनाच पाठविल्याबद्दल देवाचे आभार मानू लागली. धावत शेजारणीला घेऊन आली. पुढची कथा आपल्या अपेक्षेनुसार घडत गेली.

डॉ. मांडकेंनी मुलाचे ऑपरेशन करून तो बरा होईपर्यंत तिला हॉस्पिटललाच ठेऊन घेतले आणि बरे करूनच घरी पाठविले!

ती बाई तर अत्यानंदात घरी गेली पण इकडे डॉक्टरांनीही मनातल्या मनात मान्य केले की देव ही एक अशी काहीतरी शक्ती आहे. की जी मनापासून केलेल्या प्रार्थनेला नक्की प्रतिसाद देते. खरोखर प्रार्थनेत प्रचंड ताकद असते.

# <u>एका डॉक्टरची गोष्ट</u>

महाराष्ट्रात कोकणातील महाड या शहरापासून 10-20 किलोमीटरवर बिरवाडी नावाची छोटीशी वस्ती आहे. लोकसंख्या 5-6 हजार असेल. वस्तीभोवती घनदाट जंगल! जंगलातच वस्ती होती म्हणा ना! त्यामुळे विंचू-साप यांचा मुक्त वावर! त्यांच्या दंशाने अनेक लोक मृत्युमुखी पडायचे. ही साधारण चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. एक सरकारी दवाखाना होता. तेथे पोस्टिंग झालेले डॉक्टर काही दिवसातच स्वतःची खाजगी प्रॅक्टिस सुरू करायचे. सरकारी पगार तुटपुंजा असायचा. रोग्यांना फुकट देण्याची औषधे विकत द्यायचे. असा गैरप्रकार चालायचा.

अशा बिरवाडी वस्तीत सरकारी दवाखान्यात डॉ. बावस्कर यांची पहिली नेमणूक झाली. त्यांनी प्रथमच ठरवून टाकलं की 'मी कोणत्याही प्रकारची बेइ      मानी करणार नाही. '

त्यांच्या लक्षात आलं की विंचू-दंशामुळे मृत्यु ही या भागातील मोठी समस्या आहे. सर्पदंशामुळे मृत्यु आपण एकवेळ समजू शकतो; पण विंचू-दंशामुळेही ? एमबीबीएस च्या अभ्यासक्रमातही तसं कधी वाचण्यात आलं नव्हतं! बावस्करांनी आधीच्या डॉक्टरांकडे चौकशी केली.  पण काही फायदा झाला नाही. विंचूदंश झालेल्या पीडितांवर पारंपारिक औषधांचा काही उपयोग होत नव्हता. लोक मरत होते. डॉक्टरांना चिंता वाटत होती. त्यांच्यातील संशोधक जागा झाला. विंचूदंशांच्या केसेसची नोंद ठेवायला त्यांनी सुरुवात केली. पेशंटचे हृदय.  फुप्फुसे एकूण लक्षणे याचा ते बारकाईने अभ्यास करू लागले. कुठल्याही देशी-विदेशी मेडिकल जर्नल मधे विंचूदंशाबद्दल काहीही माहिती मिळाली नाही. या विषयात मूलभूत संशोधनाची गरज आहे.  हे त्यांना कळून चुकले. सहा महिन्यात विंचू चावून वीस माणसे मेली होती.

डॉक्टरांनी रात्रंदिवस काम सुरू केले. त्याचे फळही त्यांना मिळाले. अथक परिश्रमानंतर त्यांनी 'प्राझोसिन' नावाचे औषध शोधून काढले. ते दिले की विंचूदंशाचा पेशंट वाचतो.  हा अनुभव त्यांना आला. मृत्यूचं शेकडा प्रमाण चाळीस ने कमी झालं!! त्यांचं हे संशोधन व निरीक्षणे 'लॅन्सेट' नावाच्या प्रसिद्ध व प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या मेडिकल जर्नल मध्ये छापलं गेलं. हा एक बहुमानच होता.

डॉ. बावस्कर हे नाव देश-विदेशात पसरलं! इथले स्थानिक लोक. ज्यांनी त्यांना 'वेडा' ठरवलं होतं ते ही लज्जित झाले आणि आता डॉक्टरांना मान देऊ लागले. ज्या मोठमोठ्या विदेशी डॉक्टरांची नावं फक्त मेडिकल जर्नलमध्ये वाचली होती. त्यांनाही भेटण्याची व त्यांचं कौतुक मिळविण्याचं भाग्य बावस्करांना लाभलं. त्यामुळे अनेक मोठ्या शहरातून त्यांना नोकरीसाठी बोलावण्यात आलं. पण बिरवाडीत राहून तिथेच गरजू रोग्यांची सेवा करण्याचं व्रत त्यांनी घेतलं होतं. ते त्यांना सोडायचं नव्हतं. शहरातल्या नोकरीचा मोह त्यांना कधीच पडला नाही. बिरवाडीत राहूनच त्यांना आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली होती.

कोण होते हे डॉ. बावस्कर? कुठून आले होते? तेही जाणून घेण्यासारखं आहे. मराठवाड्यात जालना जिल्ह्यात देहेड नावाचं छोटंसं गाव आहे. वस्ती फक्त पाचशे! तिथे 1948 साली एका मागास कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आई-वडील निरक्षर होते. पण शिक्षणाचं महत्त्व जाणत होते. ते गरीब होते;पण आपल्या दोनही मुलांना खूप शिकवायचं हा त्यांचा निश्चय होता. शिक्षणाबद्दल त्यांचे विचार ऐकून गावातले लोक वडिलांना 'बॅरिस्टर' म्हणत असत.

हिम्मतने पाचवी इयत्ता पास केली तेव्हा त्याला वडिलांनी शिकण्यासाठी बुलढाण्याला पाठवलं. पण पैसे कुठे होते? 11-12 वर्षाचा हा मुलगा एका मंदिरात फरशीवर झोपायचा; सार्वजनिक नळावर अंघोळ करायचा. एका लहानशा मेडिकल स्टोअर मधे झाडू-पोछा व इतर कामे करायचा. मग शाळेत जायचा. कधी जेवायला मिळायचं तर कधी उपाशीच! हिम्मत हुशार होता. नेहमी पहिलाच नंबर! मग तो मॅट्रिक झाला. तेही पहिल्या नंबरने!

त्यानंतर नागपूर मेडिकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळाला व अखेर हिम्मत एमबीबीएस उत्तम गुणांनी पास झाला. याच सुमारास मोठा भाऊ भगवान हेही शेतीविषयक डिग्री घेऊन ऍग्रिकल्चर ऑफिसर झाले होते. दोन्ही मुलांना उच्चशिक्षित करण्याचं आई-वडिलांचं स्वप्न पूर्ण झालं होतं. डॉ. हिम्मतराव बावस्करांना पहिली नोकरी बिरवाडीत मिळाली व ते यशाच्या पायऱ्या चढत चढत गेले. शिक्षणाशिवाय विकास नाही. हे त्या अशिक्षित पालकांना पटलं होतं. त्यांचे संस्कार. थोरल्या भावाची भक्कम साथ याच्या जोरावरच डॉक्टर पुढे जाऊ शकले. पुढे त्यांनी एमडी. ची डिग्रीही घेतली. त्यांच्या डॉक्टर-पत्नीचीही त्यांना मोलाची साथ मिळाली.

मित्रांनो.  प्रयत्न.  जिद्द व चिकाटी याच्या जोरावर डॉक्टर हिम्मतराव बावस्कर हे अलौकिक यश मिळवू शकले. आपल्या सरकारने त्यांना पद्मश्री देऊन त्यांचा गौरव केला आहे. नोबेल सारखं ही पारितोषिक उद्या त्यांना मिळू शकेल! एवढं त्यांचं काम मोठं आहे. लक्षात ठेवा. गुण.  हुशारी यश ही काही फक्त उच्चवर्णीयांची मक्तेदारी नाही. जात-पात.  श्रीमंत-गरीब अशा भेदांपासून आपण दूर राहिले पाहिजे.

डॉ. बावस्कर आजही महाड मध्ये राहून रुग्णांची सेवा करत आहेत. 'बॅरिस्टरचं कार्टं' नावाचं त्याचं आत्मचरित्र मिळवून जरूर वाचा.

# गौतम बुद्ध व अंगुलिमाल

प्राचीन काळची गोष्ट. इसवी सनापूर्वी सुमारे 600 वर्षांपूर्वीची. गौतमबुद्ध यांचे मूळ नाव सिद्धार्थ. त्यांचा जन्म आजच्या नेपाळमध्ये लुंबिनी नामक राज्यात झाला होता. बालपणीच लग्न झाले पण राजपुत्र सिद्धार्थने सर्व राजविलास सोडून संन्यास घेतला. ज्ञानाचा शोध घेण्यासाठी ते बाहेर पडले. ते ठिकठिकाणी जाऊन लोकांना उपदेश देत असत.

एकदा गौतम बुद्ध मगध देशात (आजचे बिहार राज्य) सोनापूर या गावी एकदा कामानिमित्त गेले. लोकांनी त्यांचे स्वागत करून भोजन वगैरेची व्यवस्था केली व उपदेश देण्याची विनंती केली.

'तत्पूर्वी मला एका प्रश्नाचे उत्तर हवे आहे' बुद्ध म्हणाले. 'या गावात प्रत्येक माणसाच्या हाताला चारच बोटे असून करंगळी तुटलेली आहे. असे मी पाहिले. असे का बरे?'

एका सज्जनाने सांगितले. ' महाराज. इथे जंगलात अंगुलीमाल नावाचा डाकू राहतो. तो लूटमार करतो. गावात शिरून लोकांना लुटतो आणि त्या माणसाची करंगळी कापून नेतो. बोटांची माळ करून त्याने ती गळयात घातली आहे. फार भयंकर असा डाकू आहे तो. त्याच्या भीतीने सूर्यास्तानंतर कोणी घराबाहेर पडत नाही. '

हे ऐकून बुद्ध विचारमग्न झाले. त्यांनी त्या डाकूला भेटण्याचे ठरविले. लोकांना त्यांनी सांगितल्यावर सर्वांनी न जाण्याचा सल्ला दिला. विनंतीही केली पण बुद्धांचा निश्चय झाला होता. ते चालत जंगलाकडे निघाले. अंगुलीमालपर्यंत ही बातमी केव्हाच पोहोचली होती. तो वाट पाहात होता. की कोण हा जिगरबाज माणूस मला भेटायचं म्हणतो आहे!

आपल्या गुहेकडे येतांना त्याने बुद्धांना पाहिले. तोच त्यांना म्हणाला. 'माझ्या गळयातल्या माळेत नऊशे नव्याण्णव बोटे आहेत. तू आलास बरं झालं. आता मरायला तयार हो. म्हणजे माझ्या माळेत हजार बोटे पूर्ण होतील. '

बुद्ध शांत होते.  ते पाहून त्या डाकूला आश्चर्य वाटले. या संन्याशाचे मन काहीतरी वेगळेच दिसते आहे. तो मनात म्हणाला. बुद्ध म्हणाले.  'मी मरायला तयार आहे; पण मरणापूर्वी तू माझ्या दोन इच्छा पूर्ण करशील का?' डाकू म्हणाला.  'बोल; काय इच्छा आहेत?'

बुद्ध म्हणाले.  'हे मोठे झाड आहे ना.  त्याची थोडी पाने तोडून आण. '

'बस् ;एवढंच? मी तर सारे झाड क्षणार्धात तोडून आणू शकतो. मी एकटाच जगात सर्वशक्तिमान आहे!' असे म्हणून त्याने झाडाची काही पाने तोडून आणली व बुद्धांपुढे ठेवली.

'बोल.  तुझी दुसरी इच्छा काय आहे?' अंगुलीमालने आपली तलवार सावरत विचारले.

'माझी दुसरी इच्छा अशी की आता ही तोडलेली पाने पुन्हा झाडाला जोडून दाखव. मग तू मला मारू शकतोस. '

अंगुलीमाल म्हणाला.  'बाबा.  वेडा आहेस का तू? तोडलेली पानं पुन्हा कशी जोडणार?'

'काय हरकत आहे? तू सर्वशक्तिमान आहेस ना.  मग तुला हे आलं पाहिजे!' बुद्ध उत्तरले.

आता अंगुलीमाल गप्प बसला. त्याला गप्प पाहून बुद्ध म्हणाले.  ' म्हणजे जगात तुझ्यापेक्षा शक्तिमान कोणीतरी आहे; पटलं ना तुला ? ज्याने ही पानं झाडावर फुलविली आहेत. त्या शक्तीला शरण जा. हिंसा हे पाप आहे. अहिंसाच तुला शक्तिमान बनवेल. लोकांना मारण्याऐवजी त्यांच्यावर प्रेम कर. प्रेम हीच जगातली सर्वात मोठी शक्ती आहे. '

हे ऐकून अंगुलीमालचं हृदयपरिवर्तन झालं. त्यानं बुद्धांच्या पायांवर लोटांगण घातलं. 'मला तुम्ही तुमचा शिष्य म्हणून घ्या; मला या पापातून मुक्त करा. '

बुद्धांनी त्याला उठवले त्याला शिष्य म्हणून स्वीकारलेही. मित्रांनो. पुढे अंगुलीमालने सोनापूर गावात जाऊन तिथल्या माणसांची क्षमा मागितली. तो म्हणाला. ‘मी तुमची बोटे तर तुम्हाला परत करू शकत नाही. पण मी इथे राहून तुमची सेवा करू इच्छितो. ’

गावकऱ्यांनी अंगुलीमाल ला माफ केले व बुद्धांचे आभार मानले.

बालमित्रांनो. लक्षात ठेवा. तोडणे सोपे असते पण जोडणे अवघड असते. आपण माणसे जोडायलाच शिकले पाहिजे; आणि माणसं फक्त प्रेमाने जोडली जाऊ शकतात. आपल्या बाबांचा अवतार प्रेमस्वरूपच होता. ते प्रेमाचेच मूर्तरूप होते.

दुसरे म्हणजे. कोणताही माणूस पूर्ण वाईट नसतो. योग्य मार्गदर्शन मिळालं की त्याचं हृदयपरिवर्तन होऊ शकतं. मात्र त्याची ती इच्छा असावी लागते.

अंगुलीमालच्या मनात गर्व होता. तसा गर्व कधीही बाळगू नये. आपल्यापेक्षा सरस. अधिक गुणवान कोणीतरी असतंच. हे लक्षात ठेवावं. म्हणूनच म्हणतात. Always there is a room at the top!

# दांडी-यात्रा

महात्मा गांधी यांनी बरेच वर्षे स्वातंत्र्य-लढ्याचे नेतृत्व केले. 1929 साली त्यांना कळून आले की आता नेतृत्व नव्या पिढीच्या हातात सोपविले पाहिजे. तसेच त्यांना बहुजन समाजाची साथ मिळवून दिली पाहिजे. म्हणून त्यांनी भारताच्या व्हाइसरायना पत्र लिहिले.

'लष्करी खर्च निम्मा करा. सरकारी अधिकाऱ्यांचे वेतन कमी करा. दारूबंदी करा. शेतसारा कमी करा. मिठावरचा कर रद्द करा. गरीब शेतकऱ्यांना मीठ-भाकरी खाऊ द्या. शस्त्रे वापरण्यास परवानगी द्या……' आणखी बरेच काही लिहिले होते. पण या सर्व मागण्या फेटाळण्यात आल्या.

पुढे काय करावे ते गांधींना सुचेना. राष्ट्राचे डोळे गांधींकडे लागले होते. राष्ट्राचे ते ऊर्जाकेंद्र होते. राष्ट्रकवी रविंद्रनाथ टागोर गांधींना भेटायला आले. 'हिंदुस्तानचे दारिद्र्य' या ग्रंथात दादाभाई नौरोजींनी लिहिले होते. ' मिठासारख्या अत्यावश्यक वस्तूवर कर लावून इंग्रजांनी अत्यंत मोठा अन्याय केला आहे. यासाठी जनता नक्की बंड करून उठेल. ' कर एवढाच अन्याय नव्हता. तर मीठ बनवायलाही भारतीयांना परवानगी नव्हती. फक्त इंग्रज सरकार मीठ बनवून नेटिव्हांना चढ्या भावाने विकत असत.

दादाभाईंच्या त्या वाक्याने गांधीजींना मार्ग सुचला् मिठाची 'कायदेभंग चळवळ' सुरू झाली 12 मार्च 1930 रोजी साबरमतीच्या आश्रमापासून पहाटे 'दांडीयात्रा' पायी सुरू झाली. सुरवातीला 78 जणांसह चालू झालेल्या या यात्रेत पुढे जाता जाता शेकडो लोक सामील झाले. चोवीस दिवस ही यात्रा चालू होती. 6 एप्रिल 1930 रोजी दांडी या गावी समुद्रकिनारी ही यात्रा पोहोचली. तोपर्यंत अनुयायांची संख्या 300 झाली होती. तिथे गांधींनी इतरांसह मीठ बनविले व कायदा मोडला. मूठभर मीठ बनवून दांडीयात्रा यशस्वी झाली.

सरदार वल्लभभाई पटेलांना आधीच अटक झाली होती गांधीजी त्यांना म्हणाले होते. ''पुढे जाऊन तुरुंगात माझ्यासाठी जागा करा. ''त्याप्रमाणे गांधींसह अनेकांना अटक झाली. या यात्रेमुळे सबंध भारतात जागृती झाली. व सर्वजण आंदोलने करू लागले. त्यामुळे इंग्रजांना भीती बसली की आता आपल्याला भारतीयांना अधिक दडपून ठेवता येणार नाही.

फायदा असा झाला की. इंग्रजांनी प्रथमच पुढाऱ्यांना राऊंड टेबल कॉन्फरन्स ला लंडन येथे बोलावले व प्रथमच बरोबरीच्या दर्जाने वागविले. पुढे गांधी-आयर्विन चर्चा होऊन गांधीजींच्या बऱ्याच मागण्या मान्य करण्यात आल्या. दांडीयात्रेपासूनच देशाच्या स्वातंत्र्य-लढ्याला अधिक वेग आला. म्हणून तिचे महत्त्व अधिक आहे.

मित्रांनो. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. त्यामागे म. गांधी यांचे तर योगदान आहेच पण सामान्य जनताही त्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली होती. शिवाय अनेकांनी प्राणांची आहुतीही दिली. यामागे देशभक्ती ही जबरदस्त प्रेरणा आपल्याला दिसून येते. आजकाल आपली ही भावना कमी पडली आहे का? किंवा पार नष्ट झाली आहे? आता आपल्याला स्वातंत्र्यलढा द्यायचा नसला म्हणून काय झालं. आपल्या देशापुढे इतरही आव्हानं आहेत! आपली देशभक्ती फक्त क्रिकेट मॅचपुरती मर्यादित तर नाही ना? विचार करा. देशावर जास्तीत जास्त प्रेम करा.

2 ऑक्टोबर हा म. गांधींचा जन्मदिवस आहे. त्याचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त करणं हे आपलं कर्तव्यच आहे.

# वर्धमान महावीर

वर्धमान महावीर हे नाव तुमच्या परिचयाचं असेलच. हं; बरोबर आहे जैन धर्माचे संस्थापक म्हणून ओळखले जाणारे महावीर. 29 मार्च ही त्यांची जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी होते. महावीर हे ख्रिस्तपूर्व अंदाजे 600 वर्षे जन्मले. म्हणजे आजपासून 2600 वर्षांपूर्वी. त्यांचा जन्म राजघराण्यात झाला होता. वडील म्हणजे राजे सिद्धार्थ व आई राणी त्रिशला. त्रिशला ही इक्ष्वाकू वंशातील म्हणजे श्रीरामाच्या वंशातील होती. जुन्या कंडलग्रामला बासुकुंड हे नाव आहे जे आताच्या बिहारमध्ये येते. तेथे महावीरांचा जन्म झाला. पटना या शहरापासून ते 55किलोमीटर दूर आहे. त्यांच्या जन्मानंतर राज्याची भरभराट झाली म्हणून त्यांचे नाव वर्धमान ठेवण्यात आले होते. वीर महावीर अशीही आणखी नावे होती.

राजपुत्र असूनही त्यांनी आपला राजवाडा तिसाव्या वर्षीच सोडला. शुद्ध ज्ञान मिळवायचे हा एकच हेतू त्यांच्या मनात होता. साल वृक्षाखाली साधना करून त्यांनी आत्मज्ञान मिळविले. 2600 वर्षापूर्वी लिखित साहित्य असणे शक्य नव्हते; सगळे ज्ञान मौखिक (तोंडी पाठांतर ) पद्धतीने शिष्यांमार्फत पुढे पोहोचविले जायचे.

महावीरांनी ज्ञान मिळविले व काही तत्त्वे सांगितली. त्यांची सर्व शिकवण गौतमस्वामी या शिष्याने पुढे लिहून ठेवली आहेत. महावीर हे जैन धर्मीयांचे 24 वे तीर्थंकर आहेत. तेविसावे तीर्थंकर पार्श्वनाथ हे होते. या दोघांच्या विचारसरणीत फरक होता. आपण त्या तपशीलात जाण्याची गरज नाही. वर म्हटल्याप्रमाणे मौखिक ज्ञान-प्रसार पद्धतीमुळे. गौतमस्वामींच्या आधीचे लिखाण ठोस पुराव्यासह उपलब्ध नाही.

आपण जैन धर्माची शिकवण काय ते पाहणार आहोत. 2600 वर्षांपूर्वी सांगितलेली तत्त्वे मानवाला आजही उपयुक्त आहेत. याचे कारण. मानवाने नुसतीच भौतिक प्रगती केली; पण स्वतःच्या मानव म्हणून असणाऱ्या आध्यात्मिक उन्नतीकडे त्याने अक्षम्य दुर्लक्ष केले. आध्यात्मिक

उन्नती म्हणजे नेमकं काय? रामायण-महाभारत; बायबल. कुराण वाचायचं का? नुसतं वाचायचं नव्हे तर त्या सर्व ग्रंथात सांगितलेल्या मूल्यांच्या अनुसार आपण समाजात वागायचे. कोणत्याही धर्मात वाईट काहीच सांगितलेलं नसतं. चांगल्या गोष्टी कराव्यात. दुसऱ्याला दुःख होईल. दुसऱ्याचे नुकसान होईल असे वागू नये. हेच सर्व शिकवणुकींचे सार असते.

महावीरांनी मुख्य पाच तत्त्वे सांगितली आहेत. सत्य. अहिंसा. अचौर्य. अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही ती तत्त्वे होत. सत्य याचा अर्थ खरे बोलावे ; खोटे बोलू नये. एवढ्यापुरताच मर्यादित नाही. आपण आपले काम प्रामाणिकपणे करणे. लाच देणे-घेणे यापासून दूर राहणे हाही सत्याचाच भाग आहे. परिक्षेत कॉपी न करणे. फसवणूक न करणे. व्यापारात अवाजवी फायदा न उकळणे याही गोष्टी सत्य या सदराखालीच येतील. अशी यादी तुम्हाला स्वतःलाही करता येईल. आपल्याला चांगले काय व वाईट काय याचे उपजतच ज्ञान असते. त्याला सदसद्विवेकबुद्धी म्हणतात. त्यामुळे वाईट काय व ते करू नये हे आपल्याला समजत असते. (पण आपण तिकडे दुर्लक्ष करतो).

दुसरे तत्त्व अहिंसा. हिंसा म्हणजे दुसऱ्याला जिवे मारणे. हत्त्या करणे. देवदेवतांच्या नावाखाली प्राण्यांना बळी देणे या सर्व हिंसा आहेत. मग नॉन-व्हेज खायचेच नाही काय? असे तुम्ही विचाराल. याचे उत्तर ‘नाही खायचे’ असेच आहे!! एका प्राण्याला मारून आपण आपल्या जिभेचे लाड पुरवायचे. यात कसला आलाय् आनंद? तुमच्या आणखी एका प्रश्नाचे उत्तर आधीच देते. ‘वाघ शेळीला खातो. त्याचे काय?’ हाच ना प्रश्न? याचे उत्तर आहे की ते वाघाचे नैसर्गिक अन्न आहे. याउलट आपले लहान आतडे फक्त शाकाहारी अन्नापुरतेच सक्षम आहे. मांसाहार आपल्यासाठी उचित नाहीच. ( महावीरांचा ही वैज्ञानिक दृष्टिकोन होता. असे म्हणता येईल!) हल्ली अनेक पुढारलेल्या देशातील लोकही शाकाहाराकडे वळू लागले आहेत. इथे शेती व शेतकरी यांचे महत्त्वही जाणून घ्यायला हवे.

धर्माच्या नावाखाली माणसे मारली जाणे हा तर अक्षम्य अपराध आहे. कुठल्याही धर्मात हिंसेचा निषेधच केला आहे. नुकतीच इराणमध्ये निवडून 39 माणसांना मारल्याची बातमी आली. आतंकवादामुळे अनेक सैनिक शहीद होत आहेत. हे सर्व चिंताजनक आहे.

याउलट दुसऱ्याला शब्दांनी दुखवणे ही सुद्धा हिंसा आहे असे महावीर सांगतात. सर्व संतही सांगतात. इतकेच नाही. तर मनाने दुसऱ्याबद्दल वाईट चिंतणे हीदेखील हिंसा आहे! या अमुक मुलाला माझ्यापेक्षा कमी मार्क मिळू दे असा विचार करणे ही मानसिक हिंसाच गणली गेली आहे. त्यामुळे सावध रहा. आता लक्षात आले ना की अहिंसा हे तत्त्व आचरणे अवघड आहे. पण अशक्य नाही.

तिसरे तत्त्व आहे अचौर्य. सोपे आहे. कधीही चोरी करू नका. चोरीचा अर्थ इथे व्यापक आहे. न विचारता दुसऱ्याची एखादी वस्तू घेणे ही चोरीच आहे. दुसऱ्याला नाही मिळालं तरी चालेल; पण मला मिळायला हवं. ही चोरीच आहे. शेतकऱ्याला योग्य भाव न देता मधले दलाल त्याच्या वाटणीचे पैसे घेतात ही मोठी चोरीच आहे. गैर मार्गाने पैसे लुटणे ही चोरीच. याअर्थे नीरव मोदीही चोरच ठरला आहे. श्रीमंतलोक इतरांचे शोषण करून अधिक श्रीमंत होत असतील. ती चोरीच होय.

वरीलप्रमाणे पैसा किंवा कुठल्याही गोष्टीचा साठा करणे याला परिग्रह म्हणतात. असा साठा न करणे म्हणजे अपरिग्रह. काहींना कपडे खरेदी करण्याचा फार षोक असतो. कपाट भरलं तरी ते खरेदी करतच राहतात. आपण जे खूप घेतो. तिथे दुसऱ्याला कमी पडत असतं. मागणी जास्त झाली की भाव वाढतात व मध्यमवर्ग व गरीब भरडला जातो. म्हणून अपरिग्रह वृत्ती ठेवावी. समाजात असमानतेची दरी अपरिग्रहच नष्ट करेल.

पाचवे तत्त्व आहे ब्रह्मचर्य याचा अर्थ केवळ लग्न न करणे. एवढाच नाही तर सुखलोलुपवृत्ती सोडून द्यावी. असा आहे. भोगविलास टाळावेत.

पर्युषण पर्वात आणखी पुढील गोष्टी पाळाव्यात असे महावीर सांगतात. क्षमा. संयम. अहिंसा. तप. त्याग. प्रेम. करुणा. शील (Character)व सदाचार हे धर्म पाळावेत.

महावीरांनी जे 2600 वर्षांपूर्वा सांगून ठेवलं आहे. तेच त्यानंतरचे संत. स्वामी. महाराज हे सांगत आहेत. तुमच्या लक्षात येईल की तुम्हाला आपल्या सर्वांनाच खूप ‘शिकायचे’ आहे. महावीरांची शिकवण आपण जास्तीत जास्त आचरणात आणायचा प्रयत्न करू या.

वयाच्या 72 व्या वर्षी पावापुरी म्हणजे आजचे राजगीर (राजगृह-बिहार ) येथे महावीरांना कार्तिक कृष्ण अमावास्या या दिवशी मोक्षप्राप्ती झाली.

महावी- व इतर सर्व 23 तीर्थंकरांच्या प्रतिमा बादामी गुंफा (कर्नाटक) येथे पाहायला मिळतात.

# रामानुजन्

मित्रांनो. जसे आपले सण असतात तसे काही विशेष दिवसही आपण साजरे करतो. 22 डिसेंबर हा विशेष दिवस आपण 'मॅथेमॅटिक्स डे' म्हणजे गणित दिवस म्हणून मानतो. हाच दिवस का? तर सुप्रसिध्द भारतीय गणितज्ञ रामानुजन अय्यंगार यांचा तो जन्मदिवस आहे! अशा दिवशी मुद्दाम त्यांची आठवण केली जाते. मोठ्या लोकांबद्दल जाणून घेण्यामुळेही आपल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडतो; आपल्याला प्रेरणा मिळते व आपल्यावर चांगले संस्कारही घडतात.

तामिळनाडूमधील (त्यावेळचा मद्रास प्रांत) इरोड या छोट्याशा गावी 22 डिसेंबर1887 रोजी रामानुजन् यांचा जन्म झाला. कुंभकोणम येथे प्राथमिक शिक्षण झालं. एकदा शिक्षक वर्गात गणितातील भागाकाराची क्रिया शिकवत होते. तेव्हा ते म्हणाले. 'कोणत्याही संख्येला त्याच संख्येने भागलं तर उत्तर 'एक' येतं. उदा. 5/5=1. '

रामानुजन् उभा राहिला व त्याने विचारलं. 'गुरुजी. शून्य भागिले शून्य याचं उत्तरही 'एक' येईल ना? कारण शून्य गुणिले एक चे उत्तर शून्य येते ना! मग शून्य भागिले शून्य चे उत्तर एक हेच असायला पाहिजे. '

गुरुजी अवाक् झाले. त्यांनाही रामानुजनच्या प्रश्नाचे उत्तर नक्की देता येत नव्हते. पण हा मुलगा असामान्य बुद्धिमत्तेचा आहे हे त्यांनी ओळखले.

रामानुजन चा जन्म अत्यंत गरीब घरात झाला होता. त्याचे वडील श्रीनिवास अय्यंगार हे पूजा-पाठ इ. धार्मिक कार्ये करून पैसे मिळवत असत. आई कोमलताम्मा नेटका संसार करत असे. गरीबीमुळे रामानुजनला कुंभकोणमला शाळेत अनवाणी पायाने काही मैल चालत जावे लागे.

एकदा गणिताचा तास चालू होता; तेवढ्यात गुरुजींना 'मुख्याध्यापकांनी बोलावले आहे' . असा निरोप आला. गुरुजींनी विद्यार्थ्यांना एक उदाहरण घातले. '1+2+3+4+5+.... +100 अशी एक ते शंभर अंकांची बेरीज करून ठेवा; तोपर्यंत मी काम आटोपून येतो. '

असे म्हणून ते वर्गाबाहेर पडणार इतक्यात रामानुजन उभे राहून म्हणाला. 'गुरुजी. माझी बेरीज झाली. उत्तर आहे 5050. '

गुरुजींनी विचारलं. 'झालं इतक्या झटकन्?

रामानुजन म्हणाला. 'हो. सोपंच आहे; 100+1=101; 99+2=101; 98+3=101; 97+4=101;.... अशा पन्नास जोड्या होतात; म्हणून लगेच उत्तर सापडले.

( 100×50=5000; अधिक 1×50=50 म्हणून 5050 होतात. ) शिक्षक पुन्हा एकदा अचंबित झाले!! त्यांनी रामानुजन ला शाबासकी दिली.

अशा प्रकारे रामानुजनला गणितात उत्तम गती होती. मात्र इंग्रजी हा विषय सोडल्यास तो बाकीच्या विषयात जेमतेम पास होई किंवा नापासही होत असे. त्याला वाचनाचीही खूपच आवड होती. एकदा लायब्ररी बंद होती म्हणून मित्राकडे एखादे पुस्तक वाचण्यास मागितले. त्याची गंमत करावी म्हणून मित्राने (तो वयाने जरा मोठा होता) त्याला एक 'त्रिकोणमिती' (Trigonometry) चे पुस्तक दिले. पण रामानुजनने त्या पुस्तकाचा चांगला अभ्यासच केला. साईन. कॉस. टॅन ही गुणोत्तरे त्याने स्वतःच शोधून काढली. झाडाची उंची. नदीपात्राची रुंदी इत्यादि मोजण्याचे फॉर्म्युलेही त्याने शोधले.

नववीत असतांनाच गणित व इंग्रजी सोडून तो सर्व विषयात नापास झाला. त्याची शिष्यवृत्ती बंद झाली. शिक्षणही बंद पडले. प्रथम तो निराश झाला. पण त्याचा गणिताचा अभ्यास वाढला. त्याने त्याचे निष्कर्ष वह्यांमध्ये लिहून ठेवलेले आहेत. त्या वह्या अजून उपलब्ध आहेत. त्याने मिळविलेली काही सूत्रे तर शास्त्रज्ञांना अजूनही उलगडलेली नाहीत. त्यावेळी कॅल्क्युलेटर अथवा कॉम्प्युटर सारखी साधनेही उपलब्ध नव्हती!

त्याने बाहेरून परीक्षा देऊन सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट ( आत्ताची दहावी ) मिळविले.

मोठ्या गणितज्ञांची पुस्तके त्याने वाचून जणूकाही 'फस्त' केली! त्याने स्वतः लिहिलेला गणिताचा एक 'पेपर' (संशोधन)1911 मध्ये जर्नल ऑफ इंडियन मॅथेमेटिकल सोसायटी च्या अंकात प्रसिद्ध झाला. तेव्हा रामानुजन फक्त 23 वर्षांचा होता. त्यावेळी तो 'मद्रास पोर्ट ट्रस्ट' मधे साधी कारकुनाची नोकरी करत होता.

केंब्रिज (इंग्लंड) विद्यापीठाचे प्रसिद्ध गणितज्ञ प्रो. हार्डी यांच्याशी रामानुजन चा पत्रव्यवहार होता. ते म्हणाले होते की ' या हिंदुस्तानी मुलाने जी सूत्रे दिली आहेत त्यातील काही तर मलाही समजलेली नाहीत! '

रामानुजन कॉलेज व विश्वविद्यालयात गेलेच नव्हते. पण त्यांचे काम पाहून त्यांना केंब्रिज विश्वविद्यालयाने बोलावून घेतले व 'उच्च संयुक्त संख्या' या विषयावरील शोधनिबंधाबद्दल बी. ए. ची डिग्री प्रदान करून त्यांचा सन्मान केला. (1916). रॉयल सोसायटी ऑफ लंडनने त्यांना 1918 मधे फेलोशिप दिली. हा तर मोठाच सन्मान समजला जातो. पुढे ते तिथेच राहून अभ्यास करू लागले. पण त्यांना तेथील हवा मानवली नाही. ते आजारी पडले. उपचारांनाही प्रतिसाद मिळाला नाही. ते भारतात परत आले. पत्नी जानकी हिने त्यांची खूप सेवा केली पण उपयोग झाला नाही. अखेर. केवळ 32 व्या वर्षी 26 एप्रिल 1920 रोजी त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ पोस्टाचे तिकिटही काढले. त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' दिले जावे अशीही आता लोकांची मागणी आहे.

इतक्या लहान आयुष्यात त्यांनी सर्वोच्च बहुमान मिळविले. मित्रांनो. तसे पाहिल्यास त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल होती. कुठल्यातरी दूरच्या खेड्यात राहून त्यांनी अभ्यासू वृत्ती. आवडीच्या विषयाबद्दलची चिकाटी. जिद्द. तर्काधिष्ठित विचार. अथक प्रयास यांच्या जोरावर अद्भुत असे यश मिळविले. त्यांचे चरित्र मिळवून तुम्ही जरूर वाचा. लक्षात ठेवा शालेय जीवनातलं यश हेच काही सर्वस्व नसतं. इतर गुणांच्या जोरावरही यशस्वी होता येतं.

रामानुजन यांना आणखीही आयुष्य मिळालं असतं तर त्यांनी देशाचं नाव आणखी उंचीवर नेलं असतं यात शंका नाही.

# खुदीराम बोस

ऑगस्ट महिना आला की आपल्या शाळेत देशभक्तीपर गीतांची प्रॅक्टिस सुरू होते. मैदानावर जोशात ही गीते म्हटली जातात. 15 ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी पाहुण्यांसमोर देशभक्तीचं प्रदर्शन होतं. त्यांच्याकडून उपदेशाचे चार शब्द ऐकून व खाऊ घेऊन आपला स्वतंत्र्यदिनाचा 'कार्यक्रम' संपतो. आपण सुटी 'एन्जॉय' करतो.

मित्रांनो. आपली अशी प्रासंगिक देशभक्ती लगेच ओसरते; पण ज्यांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्राण पणाला लावून झुंज दिली त्यांची देशभक्ती त्यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबात होती. म्हणूनच त्यांनी हसत हसत फास गळ्यात अडकवून घेतला! असाच देशभक्त होता. खुदीराम बोस! हुतात्मा झालेल्यांपैकी वयाने सर्वात लहान असा हा मुलगा. त्याची आज आठवण करू या.

खुदीराम 1889 मध्ये मिदनापूर (त्यावेळी कलकत्ता) येथे जन्मला. क्रांतीचा पहिला धमाका उडवून देणारा खुदीराम त्यावेळी 15-16 वर्षांचा होता. तो लहान असतांनाच त्याचे आई-वडील वारले. मोठ्या बहिणीने त्याचे संगोपन केले. 1905 मधे इंग्रजांनी बंगालची फाळणी केली. ज्या भागात मुस्लिम लोकसंख्या जास्त तो पूर्व बंगाल (नंतर पूर्व पाकिस्तान) व हिंदू लोकसंख्या जास्त असलेला पश्चिम बंगाल झाला. या फाळणी बद्दल सगळयांच्या मनात राग होता. इंग्रजांचे अत्त्याचार वाढत होते.

15 वर्षांच्या खुदीरामवर अरविंद घोष व निवेदिता यांचा प्रभाव पडला. ढाका येथे झालेल्या त्यांच्या सभेला तो हजर राहिला होता. निर्दोष लोकांवर होणाऱ्या अत्त्याचारांबद्दल त्याच्या मनात राग धगधगू लागला. क्रांतिकारी चळवळीत तो सामील झाला. 'वंदे मातरम्' ची पत्रकं वाटू लागला. पोलिसांकडून त्याबद्दल मारही खाल्ला.

इंग्रजांचे आर्थिक नुकसान व प्राणांचे नुकसान झाले तर त्यांना धडा मिळेल असा विचार निश्चित झाला. बारिन घोष. हेमचंद्र कानूनगो. प्रफुल्ल चाकी हे तरुण त्याच्यासोबत होते. या तरुणांनी विदेशी वस्तूंची होळी केली. किंग्जफोर्ड हा न्यायाधीश अत्यंत क्रूर होता. त्याला लक्ष्य करण्याची योजना या तरुणांनी आखली. त्याची जबाबदारी खुदीराम व प्रफुल्लने घेतली. त्यासाठी दोघांना मुझफ्फरनगर ला जायचे होते. तेथे पोहोचल्यावर एका धर्मशाळेत राहून त्यांनी

किंग्जफोर्डचा दिनक्रम काय असतो यावर नजर ठेवली. रात्री तो युरोपियन क्लबवरून साडेआठ वाजता तो बाहेर पडतो हे पाहून त्याच्या बग्गीवर खुदीरामने.  त्याने तयार केलेला बॉंब टाकला; व दोघे दोन दिशांना गेले. मोकामा घाट या स्टेशनवर प्रफुल्लला पकडण्यात आले; पण त्याने पोलिसांवर पिस्तुलाने गोळ्या झाडल्या व तिसरी गोळी स्वतःवर झाडून घेतली व देशासाठी आहुती दिली!

इकडे खुदीराम 25 मैल चालत चालत निघाला. एका ठिकाणी पाणी पिण्यासाठी थांबला तिथे पोलिस योगायोगाने आले व बयनी स्टेशनजवळ खुदीराम ला पकडण्यात पोलिसांना यश आले. कारण होते खिशात सापडलेला नकाशा. खूप मारहाण सहन करूनही खुदीराम ने साथीदारांची नावे सांगितली नाहीत. त्याच्यासमोर प्रफुल्लचे मुंडके कापून आणण्यात आले. तो दुःखी झाला पण त्याने तोंड उघडले नाही! 17 वर्षांच्या मुलाचे केवढे हे धैर्य!!

मात्र पेपर मधे वाचून खुदीरामला कळले होते की ज्या बग्गीवर त्याने बॉंब फेकला व धमाका झाला त्या बग्गीत किंग्जफोर्ड नव्हताच. त्यात त्याचे मित्र केनेडी त्यांची पत्नी व मुलगी हे होते. ते मरण पावले होते व किंग्जफोर्ड वाचला होता!

खुदीरामवर खटला भरण्यात आला व 13 जून 1908 ला त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तेव्हा खुदीराम हसत होता! अपील करण्याचीही त्याची इच्छा नव्हती; पण त्याच्या वकीलाने अपील करण्याचा हट्ट धरला. तो म्हणाला 'तुझ्यासारख्या देशभक्तांची देशाला गरज आहे'. 8 जुलैला अपीलाची सुनावणी होऊन शिक्षा कायम झाली; जज्ज साहेबांनी टाक (पेन) मोडून टाकला.

11 ऑगस्ट 1908 ला फासावर जाण्यापूर्वी खुदीराम म्हणाला.  हे माझ्या देशमाते. मी तुझ्यावर कुर्बान होण्यासाठी पुन्हा जन्म घेईन; पण तू मला ओळखशील ना? हंऽ.  माझ्या चेहरा त्यावेळी वेगळा असेल. मात्र माझ्या गळयावर ही फासाच्या दोराची खूण त्याहीवेळी असेल. त्यामुळे तू ओळखशील मला . खात्री आहे!'

मित्रांनो.  फासावर गेला त्यादिवशी खुदीरामचे वय होते 18 वर्षे.  7 महिने व 11 दिवस!!

आज तुम्ही या वयात ही कल्पना तरी करू शकाल का? ज्या वयात तुम्ही 12वीची परीक्षा. तुमचे पुढचे करियर याचे विचार करत असता. त्या वयात हा तुमचा आदर्श मित्र देशासाठी बलिदान करून गेला! यातून एवढेच स्मरणात ठेवायचे आहे की आपल्याला मिळालेलं स्वातंत्र्य फुकट आलेलं नाही. ते जपण्यासाठी मनात देशभक्तीची ज्योत सतत जागृत ठेवली पाहिजे.

आज अनेक तरुण उद्दामपणे वागून. व्यसनाधीन होऊन आपले तारुण्य फुकट घालवतांना. चौकात चकाट्या पिटतांना दिसतात. तुम्ही तसे होणार नाही याची काळजी घ्या. देशाला आदर्श तरुणांची गरज आहे.

बाबा सांगतात. तुम्हाला तीन ‘आई’ असतात; जन्मदात्री. दुसरी गुरु-माँ आणि तिसरी देशमाता! या मातेचे पांग फेडायचे आहेत. हे लक्षात ठेवा.

# एक ग्रंथ आणि दोन मित्र

थॉमस कार्लाईल हा प्रसिद्ध फ्रेंच इतिहास-तज्ज्ञ होता. पूर्ण अभ्यास करून त्याने 'फ्रेंच राज्यक्रांती' या विषयावर मोठा ग्रंथ लिहून पुर्ण केला होता. त्याला विश्वास होता की हा आपला ग्रंथ पुढील काळात नक्कीच संदर्भ ग्रंथ म्हणून महत्त्वाचा मानला जाईल. तसेच या ग्रंथामुळे त्याचेही खूप कौतुक होईल; त्याला मानमरातब मिळेल असेही त्याला वाटून गेले. आपले हस्तलिखित त्याने आपला परम मित्र जॉन स्टुअर्ट मिल याच्याकडे अभिप्रायासाठी दिले. तो म्हणाला.

'मित्रा. तू हे वाच; आणि तुझा अभिप्राय लिही. माझ्यासाठी तो खूप महत्त्वाचा असेल. कारण तू सुद्धा एक प्रसिद्ध लेखक आहेस ना!'

जॉनने ते सुट्या कागदांचे बाड हातात घेतले व लिहिण्याचे कबूल केले.

या भेटीनंतर बरेच दिवसांनी जॉन थॉमस कडे गेला. त्यावेळी फोन वगैरे सारख्या सुविधा थोड्याच होत्या? थॉमसने विचारले.

'झालं का वाचून माझं पुस्तक? कसं वाटलं? अन् हो. तुझा अभिप्राय लिहून झाला ना?'

एका दमात सर्व प्रश्न विचारून झाले तरी जॉन गप्पच होता. थॉमसकडे बघतही नव्हता.

त्याच्या खांद्यावर हात ठेवून थॉमस काळजीनेच म्हणाला.

'का रे. बोलत का नाहीस? सर्व ठीक आहे ना?' जॉनने व्यथित आवाजात सांगितलं ते याप्रमाणे—

जॉनने ते हस्तलिखिताचे कागद ज्या टेबलावर आणून ठेवले होते. त्यावर आधीच बरेचसे बिनकामाचे कागद पडलेले होते. वेळ मिळाल्यावर ते जाळून टाक असेही आपल्या नोकराला सांगितले होते. जॉनने त्याच टेबलावर नवे हस्तलिखित आणून ठेवले आहे. हे नोकराला

माहीत होण्याची शक्यताच नव्हती. जॉनही सांगायचं विसरला आणि नोकर दुसऱ्याच दिवशी कागद जाळून टाकेल याची जॉनलाही कल्पना आली नाही. अशाप्रकारे थॉमस चा ग्रंथ जळून खाक झाला होता!

थॉमस गंभीर झाला. त्याच्या काही वर्षांच्या मेहनतीवर पाणी पडलं होतं. पण जे झालं त्यावर आता काहीच इलाज नव्हता. आपल्या मित्राला दोष देऊन त्याच्यावर रागावणं. हे थॉमसला मुळीच मंजूर नव्हतं

जॉन अपराधी भावनेने निघून गेला. मन जरा शांत झाल्यावर थॉमसने विचार केला. 'हस्तलिखित जळलं म्हणून काय झालं? माझ्या डोक्यात तर सगळं आठलेलं आहे नं! मी पुन्हा आठवून आठवून लिहीन!!'

लगेच थॉमस लिहायला बसला. पुन्हा सुरवातीपासून लेखन करायचे होते. काम सोपे नव्हते. संगणक त्या काळी कुठे होता ? हाताने ओळ न् ओळ लिहायची होती. थॉमस भान विसरला. त्याची तहान भूक हरपली. एकच ध्यास! लेखन आणि लेखन!! दिवस जात होते... महिने संपले.. वर्ष संपलं! अखेर दोन अडीच वर्षांनी ग्रंथ पुन्हा तयार झाला. थॉमस आनंदात होता. तसाच तो जॉनकडे गेला. ग्रंथ त्याच्या हातात सोपवून म्हणाला.

' बघिलंस जॉन? मी पुन्हा सर्व लिहून काढलं. तेही तीन खंडात! आता हे खंड वाच आणि लवकर तुझा अभिप्राय लिहून दे बरं का. '

जॉनने लगेच वाचून अभिप्रायही लिहून दिला. खंड छापून प्रसिद्धही झाले. काही काळातच ग्रंथांचा सगळीकडे बोलबाला झाला. थॉमसच्या कामाला प्रचंड दाद मिळाली.

आजही 'फ्रेंच राज्यक्रांती' या विषयावर काहीही अधिकृत संदर्भाची गरज पडली. तर थॉमस कार्लाईलचा हाच ग्रंथ प्रमाण मानला जातो!

मित्रांनो. आत्मविश्वास व दृढनिश्चय या बळावरच थॉमस हे अवघड काम करू शकला. पुन्हा हाताने सर्व लिखाण करणे किती जिकिरीचे असेल. तुम्ही कल्पना करू शकता. पण थॉमसने चिकाटी सोडली नाही.

आणखी एक गोष्ट; त्याने मित्राचा पाणउतारा तर नाहीच केला.  पण दुसऱ्यांदाही त्याचाच अभिप्राय घेतला. कारण मित्राचीही योग्यता त्याने ओळखली होती. तशी घटना घडूनही त्यांची मैत्री अबाधित राहिली!

हीच मूल्ये स्वामींनी आपल्याला अनेकदा सांगितली आहेत; लक्षात आहेत ना? ह्या गोष्टीवरूनही आपल्याला खूप काही शिकता येईल.

# कृतज्ञता

19 व्या शतकात एक ब्रिटिश कादंबरीकार होऊन गेला. त्याचे नाव चार्ल्स डिक्सन. 1812 ते 1870 एवढंच 58 वर्षांचं आयुष्य त्याला लाभलं. पण त्यानं लिहिलेल्या अजरामर कादंबऱ्यांमुळे त्याला मोठी कीर्ती मिळाली. त्याकाळी संदेशवहनाची (फोन. तार. टीव्ही. कॉम्प्युटर इ. ) साधने उपलब्ध नसतांनाही त्याचे चाहते दूरवर पसरले होते.

चार्ल्स रोजच ठराविक वेळी फिरायला जायचा. डोक्यात लेखनाचे निरनिराळे विचार घोळवत काही मैल चालायचा. मोठी रपेट पायी मारायचा. एकदा तो असाच फिरायला गेला असतांना त्याला एक स्त्री भेटली. ती त्याच्याजवळ येऊन म्हणाली.

'आपण लेखक चार्ल्स डिक्सन आहात ना? एका समारंभात मी आपल्याला पाहिलं आहे. '

डिक्सन म्हणाला. ' हो; मी डिक्सन. काय काम आहे? बोला!'

'काम इतकंच की आपण माझ्याशी शेक-हँड कराल का. प्लीज?'

' करेन की' असं म्हणून त्याने हात पुढे केला व म्हणाला. ' पण मी आपल्याला ओळखलं नाही'.

ती स्त्री म्हणाली. 'पण मी ओळखते ना आपल्याला! मी आपली वाचक आहे. आपली सर्व पुस्तके मी वाचली आहेत. खूप सुंदर लिहिता तुम्ही. तुमच्या पुस्तकांनी मला खूप आनंद दिला आहे. तुमची पुस्तके वाचणारी बरीच माणसे आता माझे मित्र-मैत्रिणी झाली आहेत. आम्ही एकत्र जमतो ; तुमच्या लेखनाचा आनंद घेतो; चर्चा करतो. तुम्ही माझ्या जीवनात आनंद

निर्माण केला आहे. माझे जीवन समृद्ध केले आहे. असे वाङ्मय लिहिणाऱ्या हाताला...बोटांना स्पर्श करावा व कृतार्थ व्हावे असे मला वाटले. म्हणून मी आपल्याशी हस्तांदोलन करत आहे. '

हे बोलत असतांना तिने डिक्सनचा हात आदराने आपल्या हातात घेतला. डिक्सनलाही तिचे बोलणे व तिने व्यक्त केलेली कृतज्ञतेची भावना मनाला स्पर्शून व आनंद देऊन गेली. लेखनाची पावती मिळाल्यासारखे वाटले.

मित्रांनो. आमच्या लहानपणी डिक्सनचे 'डेव्हिड कॉपरफील्ड' हे पुस्तक आम्ही वाचले होते. ते तुम्हीही वाचू शकाल. कॉलेजमध्ये गेल्यावर त्यांचेच 'द टेल ऑफ टू सिटीज' हे अभ्यासले होते. आणखी एक होते 'ऑलिव्हर ट्विस्ट'. आपल्याला आनंद देणाऱ्यांपर्यंत आपली कृतज्ञतेची भावना पोहोचविण्यात एक निराळाच आनंद भरलेला आहे.

दुसरा एक प्रसंग मला आठवतो. माझ्या मैत्रिणीने सांगितलेला. नीता नेहमी शास्त्रीय गायन-वादनांच्या मैफिलींना नेहमी जात असते. एकदा एका दुर्मिळ मैफिलीला जाण्याचा तिला योग आला. ती मैफल फार दिग्गज कलाकारांची होती. पं. शिवकुमार शर्मा यांचे संतूरवादन आणि त्यांच्या तबल्याच्या साथीला उस्ताद झाकिर हुसैन. ही नावं तुम्हीही ऐकली असतील. रसिकांना ही पर्वणीच होती. पुणे येथे नूमवि शाळेच्या पटांगणात हा कार्यक्रम होता. तीन तास मैफल खूप रंगली. श्रोते आनंदरसात डुंबत होते.

कार्यक्रम संपला तरी निस्तब्ध शांतता होती. श्रोत्यांना जणू ईश्वरदर्शन झाले होते. ते अवाक् व मंत्रमुग्ध झाले होते. काही वेळाने समाधी उतरल्यासारखे दोघेही वादक स्टेजवरून उतरू लागले. टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. अनेकांनी त्यांना भेटण्यासाठी गर्दी केली. नीताची त्यांच्याशी ओळख नव्हती. पण ती शिवकुमारांच्या जवळ गेली व म्हणाली ''ज्या बोटांनी. ज्या हातांनी एवढे सुंदर वादन करून तीन तास आम्हाला स्वर्गीय आनंद दिला. त्या दिव्य हातांना मी एकदाच स्पर्श करू का? मला देवाला स्पर्श केल्याचा आनंद मिळेल. तिनं झाकिरजींनाही या बोलण्यात सामील करून घेतले. हे बोलणे शिवकुमारांबरोबरच झाकिरजींनीही ऐकले होते.

'हॉं... हॉं क्यूं नहीं?' असे शिवकुमारांनी म्हटल्यावर दोघांशीही तिने भक्तिभावाने हस्तंदोलन केले...त्यांच्या हातांवर मस्तक टेकवले. झाकिरजींनी तिचे दोन्ही हात हातात घेतले. ती त्यांना म्हणाली.

' आपण दिलेल्या आनंदाच्या बदल्यात आम्ही काय देऊ शकतो? फक्त कृतज्ञता व्यक्त करू शकतो. मनापासून धन्यवाद!'

मित्रांनो. कृतज्ञता हे जीवनातले महत्त्वाचे मूल्य आहे. आपल्यासाठी खूप लोक काही काही करत असतात. आपल्या उपयोगी पडतात; आपल्याला मदत करतात. आपले मित्र त्यांच्या सहवासातून आपल्याला आनंद देत असतात. यासगळयाबद्दल आपण सर्वांशी कृतज्ञ असलं पाहिजे. आपले आई-वडील व कुटुंबीयही आपल्यासाठी खूप गोष्टी करतात. त्यांच्याबद्दलही आपण कृतज्ञ राहिले पाहिजे. कृतज्ञ म्हणजे शेवटी काय? आपल्यासाठी. आपल्या आनंदासाठी इतरांनी केलेल्या गोष्टींची जाणीव ठेवणं. व ते जाणून त्यांच्याशी वागणूक ठेवणं. आपणही असं वागलं पाहिजे की इतरांना आपल्याबद्दल तसंच वाटलं पाहिजे.

कृतज्ञता व्यक्तही केली पाहिजे. बोलण्यातून. कधी वागण्यातून; कधी दोन्हीतूनही.

आपण देवाशी ही कृतज्ञ असलं पाहिजे; आपल्याला धडधाकट शरीर व मन तसेच चांगली बुद्धी दिल्याबद्दलसुद्धा.

या लेखात कृतज्ञता व्यक्त करणारी दोन उदाहरणे दिली आहेत. आपल्या भावना डिक्सन पर्यंत व शिवकुमार-झाकिर हुसैन यांच्यापर्यंत पाहोचविल्यावर त्यांनाही आनंद होतो हेही लक्षात घ्या. म्हणून सर्वांशी कृतज्ञ रहा. व तो भाव व्यक्त करा.

# शहीद उधमसिंह

मित्रांनो. जानेवारी महिन्यात आपला राष्ट्रीय सण असतो. प्रजासत्ताक दिन! याच दिवशी आपल्या देशाची घटना अंमलात आली. या सणानिमित्त आपण आपल्या शहीदांची-हुतात्म्यांची आठवण केली पाहिजे. त्यांच्या योगदानामुळेच आपण स्वातंत्र्य उपभोगू शकतो आहे.

पंजाबातील संग्रूर जिल्ह्यात सुनाम गावात. 26 डिसेंबर 1899 या दिवशी एका मुलाचा जन्म झाला. नाव ठेवले गेले शेरसिंह. तो लहान असतांनाच त्याच्या आई-वडिलांचा मृत्यू झाला. तो फक्त चार वर्षांचा असतांनाच त्याला अनाथाश्रमात ठेवलं गेलं. तिथे त्याच्यावर शीख-कंबोजचे संस्कार करण्यात आले व त्याचं नाव उधमसिंह ठेवण्यात आलं. तिथे राहून तो मॅट्रिक झाला. अनाथाश्रमाच्या नियमानुसार त्याला तिथून जावं लागलं. तो कसाबसा जगत होता.

तेव्हा भारतावर इंग्रजांचं राज्य होतं. 18 मार्च 1919 रोजी इंग्रजांनी रौलट ऍक्ट लागू केला. या कायद्याच्या अंतर्गत इंग्रज सरकार कोणत्याही व्यक्तीला. अपराध नसला तरी अटक करू शकत असे व दोन वर्षे तुरुंगात ठेवत असे. नुसत्या संशयावरून. खटला वगैरे न होता पकडलेल्या व्यक्तीला जेलमध्ये रहावे लागे. जनता यामुळे खूप नाराज होती. महात्मा गांधीसुद्धा या कायद्याच्या विरोधात होते. कॉंग्रेस-नेता. सत्यपाल आणि किचलू यांनाही याच ऍक्टनुसार कैद केलं गेलं होतं. भारतभर आंदोलनं झाली. पंजाबातील अमृतसर येथेही सुवर्ण-मंदिराच्या बाजूला असलेल्या जालियनवाला बागेत सभा ठरली. तो दिवस होता 13 एप्रिल 1919. त्याच दिवशी बैसाखी हा सणही होता. रौलट कायद्याच्या निषेधार्थ ही सभा होती.

जालियनवाला ही बाग 6/7 एकर क्षेत्रात पसरलेली होती. चारी बाजूंनी 10 फूट उंचीची भिंत होती. आत जाण्यासाठी पाच रस्ते होते. ते सगळे खूप अरुंद होते. या सभेत इंग्रज शिपायांनी प्रवेश केला व निरपराध लोकांवर अंदाधुंद गोळीबाराला सुरुवात केली. लोकांना बाहेर पडताही येत नव्हतं कारण सेनेने टँकर उभे करून सर्व दरवाजे बंद केले होते. गर्दी

इतकी होती की एका गोळीत तीन-चार लोक मरत होते. स्त्रियांनी अब्रू वाचविण्यासाठी मुलांसह तिथल्याच विहिरीत उड्या टाकल्या. हजारावर लोक मेले व पंधराशेच्या वर जखमी झाले. गोळ्या संपल्या तेव्हाच गोळीबार थांबला. मृतांमधे 80 वर्षांच्या वृद्धांपासून आठ आठवड्यांचे बालकही होते! म. गांधी व पं नेहरू यांनीही या घटनेचा निषेध केला. गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांनीही इंग्रज सरकार ने दिलेला सर हा किताब परत करून घटनेचा धिःकार केला.

जालियनवाला बागेच्या सभेत लोकांना पाणी वाटण्याचे काम उधमसिंह व त्याचे काही मित्र काम करत होते. त्यांनी ही घटना प्रत्यक्षच पाहिली व ते रागाने चवताळून उठले होते. उधमसिंह ते दृश्य विसरूच शकत नव्हता. तो मग क्रांतिकारी युवक संघटनेत सामिल झाला. जनरल डायर याने हा गोळीबार ज्याच्या आदेशावरून केला होता. त्याचे नाव होते मायकेल ड्वायर! तो पंजाब चा लेफ्टनंट गव्हर्नर होता. उधमसिंहच्या मते तोच या घटनेला जबाबदार होता. तो मायकेलच्या मागावरच होता.

लंडन येथील कॅक्सटन हॉलमध्ये मायकेल एका सभेला उपस्थित होता. उधमसिंहही तिथे हजर होता. त्याने एका जाड्या पुस्तकात लपवून पिस्तूलही आणले होते. संधी मिळताच त्याने मायकेलवर गोळी झाडली व मायकेल तिथेच मरण पावला. उधमसिंह पळाला नाही. शांतपणे तिथेच उभा राहिला व अर्थातच पकडला गेला. ही घटना 13मार्च 1940 ला घडली. जनरल डायर हा याआधीच आजारी पडून मेला होता.

उधमसिंहाने फाशीची शिक्षा हसत हसत मान्य केली. तो म्हणाला. “मला मरणाचं अजिबात दुःख नाही. माझ्या देशासाठी माझे प्राण जात आहेत. यापेक्षा मोठं बक्षीस दुसरं काय असू शकतं?”

उधमसिंहला 31 जुलै 1940 रोजी फासावर चढविण्यात आलं. 1947 ला भारत स्वतंत्र झाला. उधमसिंहला शहीदे-आजम (श्रेष्ठ हुतात्मा) हा दर्जा देण्यात आला. भगतसिंगला 23मार्च1931 ला फाशी झाली होती. तोच श्रेष्ठ दर्जा उधमसिंहलाही देऊन त्याचा सन्मान

करण्यात आला. उधमसिंहची देशभक्ती.  देशप्रेम व प्राणाचाही हसत हसत त्याग करण्याची वृत्ती हे गुण आपल्याला बरंच काही शिकवून जातात. आजकाल आपण देशप्रेम.  देशभक्ती हे मूल्य विसरत चाललो आहोत का? केवळ क्रिकेट मॅच पुरतं आपलं देशप्रेम उरलंय का? हा विचार करण्याची वेळ आली आहे!

आज आपण स्वतंत्र आहोत; देशासाठी फाशी जाण्याची गरज नाही. पण देश ज्या युवकांच्या हातात येणार आहे.  त्यांनी इतिहासाचा अभ्यास करून खूप काही शिकण्याची आवश्यकता आहे.

# स्वामी विवेकानंद

मित्रांनो. आपल्या देशात अनेक असे महापुरुष होऊन गेले. की ज्यांनी त्यांच्या जीवनभर समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला. देशभक्ति आणि धर्माने वागण्याची शिकवण दिली. इथे धर्मा-धर्मांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविण्याचा उद्देश नव्हता. तर सर्व धर्मांचे उद्दिष्ट एकच आहे. सत्य जाणणे; पण त्याकडे जाण्याचे मार्ग प्रत्येक धर्मात निराळे सांगितले आहेत असा अर्थ होता. अशा महापुरुषांपैकीच एक होते स्वामी विवेकानंद. हे नाव तुम्ही ऐकलेच असेल.

आधुनिक काळातले संत असंच विवेकानंदांना म्हणता येईल. त्यांचा जन्म 14 जानेवारी 1863 साली झाला व चार जुलै 1902 साली त्यांनी समाधी घेतली. म्हणजे केवळ 39 वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले. पण याच थोड्या काळात त्यांनी फार मोठे कार्य करून दाखवले. 4 जुलैला त्यांची 117 वी पुण्यतिथी आहे.

त्यांची आई भुवनेश्वरी व वडील विश्वनाथ दत्त यांचा नरेंद्रनाथ हा एकुलता एक मुलगा. घरात नेहमीच धार्मिक व आध्यात्मिक वातावरण होते. रामायण-महाभारताचे पाठ घरात होत असत. त्याचे संस्कार त्यांना बालपणापासूनच मिळाले. तरीही ते प्रथम ईश्वर मानत नसत.

छोट्या नरेंद्राला खूप स्वप्ने पडत असत. व्हिजन-जागेपणीही स्वप्न—दिसत असत. भगवान बुद्ध स्वप्नात म्हणत असत. ‘बेटा. यहां आओ’. कधी संदेश मिळे. ‘सबकुछ छोडके भगवान के रास्ते चलो. ’ शाळेत हा विद्यार्थी शिक्षकांचा लाडका होता. कारण तो इतरांपेक्षा खूप वेगळा होता. तो एकपाठी होता. अत्यंत हुषार होता. खेळांमधेही तो पुढे असे. घोड्यावर बसणे हा आवडता छंद होता.

ईश्वराचा शोध घ्यावा असे त्याला पुढे वाटू लागले. पण कर्मावर त्याचा विश्वास होता. आपल्या कर्मांप्रमाणेच आपल्याला पुनर्जन्म मिळतो यावर त्याचा विश्वास होता.

रामकृष्ण परमहंस यांच्याशी नरेन्द्र ची भेट 1881 म्हणजे विसाव्या वर्षी झाली. पहिल्या भेटीतच त्याची समाधी लागली व कालीमातेचे दर्शन झाले. रामकृष्णांनाच त्यांनी गुरु केले. महाकालीची ते पूजा करू लागले.

हिंदू धर्म व वेदांत (उपनिषद) यावर आधीरित त्यांची शिकवण होती. 1893 या वर्षी शिकागो(अमेरिका) येथे पहिलीच सर्वधर्मीय वैश्विक परिषद होती. राजस्थान मधील क्षेत्री (खेत्री) येथील अजितसिंह राजाने त्यांच्या अमेरिका-प्रवासाची व्यवस्था केली. या राजानेच पूर्वी त्यांना 'विवेकानंद' हे नाव दिले होते. 11सप्टेंबर 1893 या दिवशी. शिकागोला भाषणाच्या सुरुवातीलाच 'माय ब्रदर्स अँड सिस्टर्स ऑफ अमेरिका' असे संबोधन करून आपण सारे एक आहोत असे त्यांनी सुचविले. विश्वबंधुत्व ही हिंदुधर्माची उदात्त शिकवण असल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या या संबोधनावर टाळयांचा कडकडाट झाला. त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली.

तरुणांना जागृत केले पाहिजे असा त्यांचा प्रयत्न होता. रामकृष्णांनीच तसा आदेश दिला होता. 'Arise. awake and stop not until the goal is reached. ' हे त्यांनी तरुणांना शिकवले. (उठा. जागे व्हा आणि ध्येय गाठल्याशिवाय स्वस्थ बसू नका ) संपूर्ण विश्व एकच आहे पण आपली जन्मभूमी ही मातेप्रमाणे आहे. तिच्या रक्षणासाठी तरुणांनी शरीर कमावले पाहिजे. ते म्हणत. 'what we need is the muscles of iorn And nerves of steel. '

( आपले स्नायू लोखंडासारखे व शिरा-नसा- स्टीलइतक्या टणक झाल्या पाहिजेत) शरीर तंदुरुस्त असेल तरच मनही निरोगी राहील.

एकदा बनारसच्या अरुंद गल्लीतून विवेकानंद जात असतांना खूप माकडांची एक टोळी त्यांच्या मागे लागली. विवेकानंद धावू लागले. माकडेही त्यांच्यामागे धावू लागली. ते जोरात पळू लागले तरी माकडे त्यांचा पिच्छा सोडेनात. मग ते मागे वळले व हातातला दंडुका घेऊन माकडांवरच चाल करून गेले. ते पाहताच माकडे पिच्छा सोडून पळून गेली. यावरून त्यांनी शिकवण दिली की समस्यांना भिऊन दूर पळू नका. त्यांना सामोरे जा. म्हणजे समस्या सुटतात.

विवेकानंद यांनी बेलूर येथे रामकृष्ण मिशन ची स्थापना केली. आता त्याच्या भारतभर शाखा आहेत. अमेरिकेतही न्यूयॉर्क येथे वेदांतिक सोसायटी ची स्थपना केली. मार्गरिट या अमेरिकन स्त्रीने दीक्षा घेऊन त्यांच्या शिकवणूकीचा प्रसार करण्यास ती भारतात राहिली. तिला पुढे भगिनी निवेदिता या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांनी ‘प्रबुद्ध भारत’ नावाचे मासिकही काढले.

सर्व धर्मांची शिकवण चांगलीच असते. त्यात हिंदू धर्म सर्वसमावेशक आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

4 जुले 1902 रोजी बेलूर मठात ते ध्यानस्थ झाले. शिष्यांनी हाक मारली; गुरु रामकृष्णांचे नाव घेतले तरी ते उठले नाहीत. अशा रीतीने ते परमात्म्यात विलीन झाले.

त्यांच्या सुभाषितांची छोटी पुस्तके बाजारात मिळतात. ती खूप प्रेरणादायी आहेत. ती घेऊन जरूर वाचा.

# धौम्य ऋषि व शिष्य आरुणी

दोस्तांनो. ही महाभारतातील कथा आहे. धौम्य नावाचे एक अधिकारी ऋषि होऊन गेले. खूप विद्यार्थी त्यांच्या आश्रमात येऊन शिकून जात. असाच त्यांचा एक विद्यार्थी होता. आरुणी. पूर्वी आश्रमाच्या आसपास. भोवताली मोठी शेत-जमीन असे. त्यातच शेती करून सर्वजण उदरनिर्वाह करीत असत.

एकदा खूप मुसळधार पाऊस पडू लागला. धौम्य ऋषी शिष्यांना म्हणाले. ‘आपली शेते पाण्याने भरली तर वर्षाचं धान्याचं नुकसान होईल; व आपली पंचाईत होईल. त्यात एका शेताला तर नवीन बांध घातला आहे. तो फुटला तर प्रश्नच आहे. तिकडे जाऊन कोण पाहणी करून येईल?’

सर्वांनी माना खाली घातल्या; फक्त आरुणी म्हणाला. ‘मी जातो. गुरुजी.’

हातात एक फावडे. डोक्यावर पोतं व गुरूंची आज्ञा घेऊन आरुणी निघाला. चाटत होतं. त्याप्रमाणे बांध फुटलाच होता. फावड्याने माती सारखी व करून दगड टाकून आरुणीने प्रयत्न करूण पाहिला पण उसळून वाहणारे पाणी थांबतच नव्हते. बऱ्याच वेळा प्रयत्न करूनही डागडुजी न झाल्याने शेवटी आरुणी स्वतःच त्या भगदाडाशी झोपला. जवळच्या झाडाला घट्ट धरून तो तसा पडल्यावर पाणी शेतात जायचे थांबले.

इकडे संध्याकाळ झाली. सायंप्रार्थना करून झोपण्याची वेळ झाली. सर्वजण गुरूंना वंदन करून गेले. आरुणी नमस्कारासाठी न आल्यामुळे गुरूंनी विचारले. आरुणी कुठे आहे?’

‘गुरुजी. तुम्ही त्याला सकाळी शेतात पाठविल्यापासून तो अजून परतलाच नाही!’

‘अरे! मी विसरलो. पण तुम्ही मला हे आधी का नाही सांगितलंत?.... चला निघू या. अंधार पडायला सुरुवात झालीय.... आरुणीला शोधलं पाहिजे.’

धौम्य ऋषी शिष्यांसह निघाले. पाऊस चालूच होता. जातांना ते मोठ्यांदा हाकाही मारत होते. खूप वेळ काहीच प्रतिसाद नव्हता. अंधार गडद झाला. एका हाकेला अंधारातून उत्तर

आले. 'गुरुजी. मी इथे आहे; बांधावर.. ' सगळे आवाजाच्या दिशेने धावले. ऋषीही चिखलात उतरले. व आरुणीला हातांनी उठवून त्यांनी प्रेमाने पोटाशी धरले. 'बाळा असे का केलेस?' विचारल्यावर आरुणी म्हणाला. 'क्षमा करा. गुरुजी; पण फुटलेल्या जागी बांध घातला तरी टिकतच नव्हता. तुमची आज्ञाही मोडायची नव्हती; व सर्वांसाठी पीक सांभाळायची जबाबदारीही माझी होती. मी आपणहोऊन 'मी जातो' म्हणालो होतो. मग मला इथे आडवे पडण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. '

गुरुजींनी त्याला समजावले. 'परत येऊन आम्हाला सांगून आमची मदत घ्यायची; बेटा!'

'पण पाऊस इतका होता की.... पाणी अडवायला मला हाच उपाय सुचला. '

सगळे आश्रमाकडे परत आले. दुसऱ्या दिवशी गुरूंनी आरुणीचा मस्तक-स्पर्श करून विद्या दिली. प्रत्यक्ष न शिकताही आरुणीला 'ज्ञान' प्राप्त झाले. धौम्य ऋषींनी आशिर्वाद दिले. ' तू उद्दालक नावाने प्रसिद्ध होशील व अनेकांना ज्ञान देशील. '

अशी होती कथा. पण अशा कथा फक्त महाभारतातच घडतात अशे समजू नका. बरं का!

का? पुढील गोष्ट वाचा.

हॉलंड या देशातील काही भूभाग हा समुद्र- सपाटीपेक्षाही कमी पातळीवर आहे . म्हणजे लो लेव्हल ला. हे नेमके कसे ठरविले असेल हे मला नाही सांगता येणार. पण पाऱ्याच्या स्तंभावरून ( त्यावेळी) त्यांनी निष्कर्ष काढला असावा. त्यामुळे हॉलंडमधील त्या भूभागात समुद्राला बांध घातला आहे; मजबूत भिंत बांधली आहे. नाहीतर समुद्राचे पाणी आत येऊ शकते. त्या भींतीशेजारून पादचाऱ्यांसाठी एक रस्ताही आहे.

छोटा 5/6 वर्षांचा डॅनियल खेळत एकदा त्या रस्त्यावरून चालला होता. रस्ता तसा सुनसान होता. सहज त्याचे लक्ष गेले तर त्या भिंतीला बारिकसे भोक पडले होते. त्यातून पाणी वाहत होते. ते गावाच्याच बाजूला. याने त्यावर हात धरून पाहिला.

तेव्हा पाणी आत यायचे थांबले. मग तो तिथेच बसून राहिला कारण हात सोडला तर गळती वाढेल व समुद्रा चे पाणी आत आले तर सगळे बूडून जाऊ.  हे त्याला कळले होते. तिकडे लवकर अंधार पडतो. तसा तो पडला रहदारी काहीच नव्हती. त्यामुळे कोणीही डॅनियलला पाहू शकले नाही व तोही कोणाला सांगायला जाऊ शकत नव्हता. सकाळपर्यंत तो तिथेच बसून होता.. अतिशय थंडीत व पाण्यावर हात धरून!फ्लो थोडा वाढला होता. एवढ्यात एक व्यक्ती सायकलवरून तिथे आली. कुडकुडणाऱ्या डॉनियलकडून त्यांना सगळी हकीगत कळली. त्यांनी सायकल योग्य दिशेने पिटाळली व डागडुजी करायला एका माणसाला व बरोबर मदतीला माणसे घेऊन आले. नंतर सर्व ठीक झाले. डॅनियलला घरी पोहोचविले. त्याचे गावभर किती कौतुक झाले याची कल्पनाच केलेली बरी! शोभतो न? हा आरुणीचा धाकटा भाऊ?

# तेवीस मार्च—बलिदानाचे स्मरण

आपला स्वातंत्र्यदिन 15 ऑगस्ट रोजी येतो. हा दिवस आपण राष्ट्रीय सण म्हणून साजरा करतो. कारण त्या आधी दीडशे वर्षे आपल्याला इंग्रजांच्या गुलामगिरीत काढावी लागली होती. त्यांनी आपल्यावर अनेक अत्याचार केले.  जुलूम केले. नुसतं कोणी 'वंदे मातरम्' अशी घोषणा केली तरी त्याला बंदुकीच्या गोळया घालून मारण्यात येई. असं परकीय राज्य संपवून मिळालेलं स्वातंत्र्य फुकटात थोडंच मिळालं? त्यासाठी कित्येकांनी लढा दिला; अनेकांनी तुरुंगवास भोगला;अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांचे मोल दिले. जुलुमी इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करून फाशीची शिक्षाही काहींनी पत्करली!

अशा क्रांतिकारी देशभक्तांची यादी खूप मोठी आहे. (आजच्या पिढीला त्यांची आठवणही नाही.  हे दुर्दैव आहे. ) देशभक्तांच्या अशा यादीत भगतसिंग व त्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे सुखदेव व राजगुरु या साथीदारांची नावे खूप वर आहेत.

27 सप्टेंबर 1907 या दिवशी भगतसिंगचा जन्म पंजाब मध्ये झाला होता. त्याचे काकाही क्रांतिकारी चळवळीशी जोडलेले होते. देशभक्तीचं बाळकडू भगतसिंगाला घरातूनच मिळालं.  यात नवल ते काय?

कॉलेजमधे गेल्यावर भगवान शरण.  वीरा सुखदेव.  किशोर वर्मा.  पुष्पल या मित्रांसोबत भगतसिंग याने 'नौजवान भारत सभा' नामक संघटना स्थापन केली. महाराष्ट्रातून राजगुरुही या संघटनेत सामील झाले. कुठलीही क्रांति हत्त्यारांशिवाय होत नाही अशी या तरुणांची धारणा होती. मग त्यांनी काम सुरू केले. छोटे छोटे बॉम्ब बनविणे.  पिस्तुले जमा करणे अशी जोखमीची कामे होती. ती लपून छपून करावी लागत. थोडी जरी चूक झाली तर दीर्घ कारावास किंवा फाशी! शिवाय ब्रिटिशांचे इतरही अन्याय सहन करावे लागलेच असते.

13 एप्रिल 1919!! हा अत्यंत काळा दिवस उगवला. अमृतसर येथे जालियनवाला बागेत एकत्र झालेल्या निरपराध लोकांवर अमानुषपणे बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव करण्यात आला. यामागे क्रूरकर्मा डायर नावाचा इंग्रज अधिकारी होता. शेकडो भारतीय मारले गेले; त्यात तरुण. वृद्ध. स्त्रिया. मुले या सर्वांचा समावेश होता. हे वृत्त ऐकून भगतसिंग व त्याचे साथीदार खवळून उठले व त्यांनी कट रचून डायर व त्याचा साथीदार सॉडर्स यांना ठार केले.

जे व्हायच तेच झालं. साथीदारांसह भगतसिंगला अटक झाली. त्यांना लाहोर जेलमध्ये पाठविण्यात आलं. खटला चालला तेव्हा 6 जून 1929 या दिवशी भगतसिंगने स्वतःची बाजू मांडतांना सांगितलं. 'आम्ही जे केलं ते देशभक्तीने प्रेरित होऊन केलं. आमच्या निरपराध बांधवांच्या हत्त्येचा आम्हाला बदला घ्यायचा होता. आमच्या स्वतंत्रता-आंदोलनाचे स्रोत कोण आहेत सांगू? ती नावे आहेत गुरु गोविंदसिंग. शिवाजी. कमाल पाशा रजा खान. लफायते आणि जॉर्ज वॉशिंग्टन' असे उत्तर देत त्याने आपण केलेले कृत्य हा गुन्हा नाहीच असे सांगण्याची निर्भयता दाखविली. यानंतर देहदंडाची शिक्षा होणार हे ठरलेलंच होतं. इथे स्पष्ट होतं की भगतसिंगांच्या जीवनात त्यांनी सच्ची धर्मनिरपेक्षता अंगिकारली होती. आदर्श मूल्य ही अशी सर्वांकडून घ्यायची असतात.

23 मार्च 1931 हा दिवस निश्चित केला गेला. त्या दिवशी भगतसिंग. राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात येणार होतं. पण तिघेही अजिबात विचलित झालेले नव्हते. उलट देशासाठी आपल्याला प्राण देता येत आहेत याचा त्यांना अभिमान होता. आदल्या रात्री सगळा तुरुंग देशभक्तीपर गाण्यांनी दुमदुमून गेला. 'मेरा रंग दे बसंती चोला'

चे स्वर तुरुंगात भरून राहिले. मनोजकुमार यांचा 'शहीद' हा सिनेमा तुम्ही मुद्दाम पाहा.

ठरलेल्या दिवशी पहाटेच तिघांनाही फासावर लटकविण्यात आलं. त्या अगोदर त्यांच्या नातेवाईकांनी मागितलेली भेटही इंग्रज सरकारने नाकारून आपली हृदयशून्यता दाखवून

दिली होती. एवढेच नाही तर त्या तिघांच्या मृतदेहाचे तुकडे तुकडे करून नंतर जाळून टाकण्यात आले. इंग्रज सरकारच्या क्रूरपणाची ही परिसीमाच होती. आज हे वाचतांनासुद्धा डोळयात अश्रू उभे राहतात. मित्रांनो.  पाहिलंत ना ? आपलं स्वतंत्र्य हे अशा बलिदानांचं फलित आहे. आपण त्या स्वतंत्र्याचा गैरवापर तर करत नाही ना.  याबद्दल जागरूक राहिलं पाहिजे.

भगतसिंग ने फाशी पत्करली त्यावेळी त्याचं वय किती होतं माहीत आहे? फक्त चोवीस वर्षे. आजकालचे तरुण या वयात काय करतात? बहुतांश तरुण मौजमस्ती.  स्टेटसच्या नावाखाली दारू-सिगरेट इ. व्यसने आणि पैसा याचाच विचार करतात. काही अपवाद असतातही. पण या वयात मोहापासून दूर राहून आपण आपलं आदर्श व्यक्तिमत्त्व घडविलं पाहिजे. मोठी किंमत मोजून देशाला मिळालेलं स्वातंत्र्य व आपली लोकशाही टिकविण्याची जबाबदारी आता तुम्हा तरुणांवरच आहे; ती सांभाळणं हीच त्या देशभक्तांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# किशोरी शास्त्रज्ञ—हेतल वैष्णव

आठ-दहा वर्षांचा एक मुलगा घरी होमवर्क करत बसला होता. इतक्यात दाराचरची बेल वाजली. त्याने दार उघडले आणि बाहेर उभ्या माणसाला पाहून आईला मोठ्या आवाजात सांगितलं. ‘आई. कचरेवाला आलाय्. ’ आईनं आतून उत्तर दिलं. ‘आलेच; त्याला थांबायला सांग. ’

आईने कचऱ्याचा डबा त्या माणसाजवळ दिला. कचरा ड्रम मधे ओतून घेऊन तो गेला. नंतर आई मुलाला म्हणाली. ‘बाळा. तो कचरेवाला नाही; तो तर सफाईवाला आहे. कचरेवाले आपण आहोत; आपण कचरा करतो. ’

ही गोष्ट त्या मुलाच्या मनात पक्की बसली. त्याला कचरेवाल्याबद्दल आदर वाटू लागला. हाच मुलगा पुढे देशाचा पंतप्रधान झाला. त्यांचे नाव नरेंद्र मोदी!

घरात अशीच शिकवण मिळालेली एक मुलगी आहे. जिचे नाव हेतल. तिला कचरा गोळा करणाऱ्या बायकांबद्दल सहानुभूती वाटायची. त्यांच्याकडे तिचे बारीक लक्ष असायचे. त्यांना किती घाणीत काम करावे लागते. याबद्दल दया वाटायची. त्यांचे निरीक्षण करता करता तिच्या लक्षात आले की काही प्रकारच्या पिशव्या त्या उचलत नाहीत. कुरकुरे. वेफर्स इ. च्या बॅग्ज त्या टाकून द्यायच्या. एक दिवस तिने एका बाईला विचारले. ‘तुम्ही या पिशव्या का नेत नाही?’

बाई म्हणाली. ‘या पिशव्या कोणी घेत नाही; त्याचे पैसे मिळत नाहीत. ’

हेतलच्या मनात कुतूहल जागे झाले. या पिशव्यांचा काहीच उपयोग नाही? काहीतरी तर असेल! मग तिने तशा बॅग्ज जमवायला सुरुवात केली. कुरकुरे. हल्दिरामचे पदार्थ अशा

पिशव्या. तेही एकप्रकारचे प्लास्टिकच असते. खूप पिशव्या जमविल्यावर तिने सर्वांचे बारिक तुकडे केले व ते पातेल्यात घेऊन गॅसवर तापवले. ते वितळले. गार झाल्यावर घट्ट व कठीण असा पदार्थ तयार झाला. तिने त्याचे कुटून बारिक तुकडे केले व नंतर मिक्सर मधे घालून त्याची पूड तयार केली.

मग त्यात फेविकोल सारखा ॲडेझिव टाकून. लाटून एक सपाट फळी तयार केली. नंतर त्या फळीचे गुणधर्म तिने तपासले. त्या फळीवर पाण्याचा. एखाद्या ॲसिडचा काय परिणाम होतो; ती फळी किती वजन पेलू शकते इ. परीक्षा तिने घेतल्या. हे सर्व करतांना तिने प्रथम आई-वडिलांची व नंतर शिक्षकांची मदत घेतली. नकळत तिने प्लायवुडला पर्यायी असा नवा पदार्थ शोधला होता! यावेळी ती कितवीत होती. माहीत आहे? फक्त नववीत!

तिचा हा प्रकल्प वेगवेगळ्या सायन्स-प्रदर्शनात मांडला गेला. सर्व ठिकाणी तिला पहिला नंबर मिळत गेला.

पुढे हा प्रकल्प अमेरिकेत नेण्याची संधी तिला मिळाली. तिथे पाचशे प्रकल्पांमधे तिला दुसरा नंबर मिळाला. हेही श्रेय कमी नव्हते! अमेरिकन पेटंट ऑफिसने तिला विशेष पुरस्कार दिला. तिच्या या पदार्थाला भारतीय पेटंट तर आधीच मिळाले होते. अमेरिकेच्या एमआयटी (मेसॅच्युसेट्स् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी) या संस्थेने तर तिला अनोखी भेट दिली. त्यावेळी नव्याने शोधलेल्या आकाशातील एका लघुग्रहाला 'वैष्णव' हे नाव दिले. तेच हेतलचे आडनाव आहे!! मित्रांनो. काय वाटलं तुम्हाला हेतल वैष्णवबद्दल वाचून ?

9वी त शिकणारी एक मुलगी यशाच्या इतक्या पायऱ्या चढत कशी गेली? कुतूहल. निरीक्षण. वैज्ञानिक दृष्टिकोण. अभ्यासात व कामात एकाग्रता व चिकाटी या गुणांच्या जोरावर तिने हे यश मिळविले. बाबांनी नेहमी सांगितले आहे की तुम्ही एखादे काम जेव्हा पूर्ण एकाग्रतेने व मन ओतून कराल तेव्हा ते काम ईश्वराचे काम होऊन जाते. त्यात यश मिळतेच मिळते. अगदी

घर झाडण्याचे किंवा घरची भांडी घासण्याचे काम असो.  ते ईश्वरासाठी करायचे आहे अशा मनोभावनेने केल्यास ते चांगलेच होते. त्यात कुठेही कसर रहात नाही.

हेतल वैष्णव बद्दल विचारताय् ना? ती राजकोट (गुजराथ) येथे कॉलेज शिक्षण घेत आहे. तिच्याबद्दल आणखी जाणून घ्यायचे असेल तर इंटरनेट आहेच! तुम्हीही असं काही नक्कीच करू शकाल!

# सेवा व्रत

मित्रांनो. फ्लॉरेन्स नाइटिंगेल हे नाव तुम्हाला माहीत आहे? आपण आज तिच्याबद्दल जाणून घेऊ. जगातील ही पहिली परिचारिका. रुग्णांची सेवा करणारी नर्स. सिस्टर. नर्सिंग या उदात्त व्यवसायाची सुरुवात तिच्यापासून झाली.

फ्लॉरेन्स चा जन्म इटलीमधील फ्लॉरेन्स नावाच्याच गावी 12 मे 1820 साली झाला. ती एक वर्षाची असतांना तिचे कुटुंब लंडन(इंग्लंड) येथे स्थलांतरित झाले. श्रीमंत कुटुंबात जन्म झाल्यामुळे 'दुःख' म्हणजे काय हे तिला ठाऊकदेखील नव्हते. एके दिवशी योगायोगाने तिने जिनिव्हा (स्विट्झरलंड) येथील हॉस्पिटल बघितले. तेथील रुग्ण व हॉस्पिटल पाहून ती बेचैन झाली. फाटलेल्या चादरी. मळलेले रग व सगळीकडे अस्वच्छता. घाणीचे साम्राज्य. त्यातच पीडित रोगी. त्यांची देखभाल करणारेसुद्धा निरोगी नव्हते व त्यांना व्यसनेही होती. ते पाहून. सोळाव्या वर्षीच फ्लॉरेन्स ने ठरविलं की चांगलं 'नर्सिंग' म्हणजे काय ते मी लोकांना दाखवून देईन.

आई-वडिलांनी तिला सांगितले की आपल्या उच्चभ्रू घराण्यात असले वेड काही चालणार नाही. पण तिचा निश्चय कायम होता. विरोध पाहून तिने घरच सोडले!! ऐषोआरामाचे जीवन सोडून ती लंडनच्या एका इस्पितळात दाखल झाली व तिने काम सुरू केले. तेथे तिने बऱ्याच सुधारणा केल्या.

तिचे काम पाहून एक मिलिटरी ऑफिसर. हर्बर्ट. खूप प्रभावित झाले. याच काळात क्रिमिया (तुर्कस्तान) येथे युद्ध सुरू झाले होते. जखमी सैनिकांना नर्सिंगची गरज होती. तेव्हा हर्बर्ट यांनी तिला तिथे जाण्याची विनंती केली. ही देशसेवेची संधी आहे असे समजून फ्लॉरेन्स तिकडे निघाली. तिने आधीच ज्यांना ट्रेनिंग दिले होते अशा 38 सहकारी नर्सेस तिच्यासोबत होत्या.

युद्धभूमीवर सतत सैनिकांची सेवा करावी लागत असे. रात्री इतर नर्सेस व डॉक्टर्स विश्रांती घेत तेव्हा अंधारात. हातात एक कंदील घेऊन फ्लॉरेन्स जखमी व विव्हळणाऱ्या सैनिकांजवळ पोहोचे. त्यांची देखभाल करी. ताजी मलमपट्टी करी. त्यांच्याशी सांत्वनाचे चार गोड शब्द बोले. जाता-येता ती मंजुळ आवाजात गाणे गुणगुणत असे. गाणाऱ्या नाइटिंगेल पक्ष्यासारखा तिचा मधुर आवाज सैनिकांचे दुःख हलके करत असे. यामुळे तिला फ्लॉरेन्स नाइटिंगेल असे नाव पडले तसेच तिला जखमी सैनिक आदराने 'लेडी विथ द लँप' असेही म्हणू लागले. ती केवळ कंदील घेऊन येत असे म्हणूनच नव्हे. तर ती त्यांच्या जीवनात जगण्याच्या आशेचा प्रकाशही आणीत होती!

युद्ध संपले. फ्लॉरेन्सच्या कामाचे खूप कौतुक झाले. ती लंडनला परतली. ती स्वस्थ बसणाऱ्यांपैकी थोडीच होती ? तिने लंडन मध्ये एक 'नर्सिंग स्कूल' सुरू केले. जगातले पहिले नर्सिंग स्कूल! आज ते लंडन कॉलेज ला जोडले गेले आहे.

तिच्या कामाची दखल राजघराण्यानेही घेतली. इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरिया यांनी तिला 'रेड क्रॉस मेडल' देऊन तिचा गौरव केला. तिच्या कामाचे महत्त्व ओळखून जगात अनेक ठिकाणी नर्सिंग कॉलेजेस निघाली. पुण्यात ससून हॉस्पिटलला जोडून असे कॉलेज आहे. चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर नर्सेस जी 'शपथ' घेतात. त्यामध्ये फ्लॉरेन्स नाइटिंगेल ची आठवण करून तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. डॉक्टरी व्यवसायाइतकाच याही व्यवसायास आज प्रतिष्ठा मिळालेली आहे.

1973 सालापासून भारतानेही 'फ्लॉरेन्स नाइटिंगेल अवॉर्ड' सुरू केले आहे. निष्ठेने व करुणापूर्ण भावाने सेवा करणाऱ्या परिचारिकेला ते देण्यात येते. या व्यवसायात पूर्वी फक्त स्त्रियाच असत. पण आता पुरुष परिचारक देखील असतात. त्यांना 'ब्रदर'असे संबोधण्यात येते. या वर्षापासून भारत सरकारने. एक जून हा दिवस 'नर्सिंग केअरिंग डे' म्हणून पाळावा असे घोषित केले आहे.

मित्रांनो. तुम्हाला प्रश्न पडला असेल की सेवा करण्यास हॉस्पिटल हेच एक ठिकाण आहे का? उत्तर आहे. 'नाही'! सेवा ही अगदी साधी गोष्ट आहे. दुसऱ्यासाठी केलेले व मोबदला न घेता केलेले कुठलेही काम म्हणजे सेवा. कुठल्याही परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याला केलेली मदत म्हणजे सेवा! परिचारकांना मिळणाऱ्या पगारापेक्षा कितीतरी अधिक पटींनी ते मनोभावे व करुणायुक्त सेवा रुगणांना देत असतात.

स्वामी नेहमी सांगत. मानवसेवा हीच माधवसेवा आहे'. याचा नेमका अर्थ माहीत आहे? सृष्टीतील प्रत्येक घटकात. चराचरात ईश्वर आहे. आपण ही गोष्ट सतत लक्षात ठेवली पाहिजे. एखाद्या अंध व्यक्तीस तुम्ही रस्ता क्रॉस करायला मदत केली असेल. तुमच्या मित्राचा हात मोडला असतांना त्याला अभ्यास कॉपी करून दिला असेल. भूकंपग्रस्तांसाठी पैसे गोळा केले असतील. तुमच्या आजीला सुई ओवून दिली असेल. अशी छोटी कामेही 'सेवा' या सदरात मोडतात. फक्त तुम्ही त्यावेळी समोरच्या व्यक्तीमधे ईश्वराला पाहिले पाहिजे. मी यांना मदत केली. असा अहंकारही येता कामा नये. निःस्वार्थ मनाने तुम्ही जे इतरांसाठी कराल ती सेवा! अशी सेवा करून. पाहा किती आनंद मिळतो ते!! 23 नोव्हेंबर ला भगवान बाबांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त आपण सारे सेवाव्रत घेऊ या.

# मोठ्यांचे मोठेपण कशात असते ?

मित्रांनो.

आपल्या देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद. त्यांची ही गोष्ट.

रत्ना नावाचा त्यांचा एक अगदी जुना व विश्वासू नोकर होता. राष्ट्रपतींच्या अभ्यासिकेत जाण्याची रत्नाला पूर्ण मुभा होती. बाकीच्या नोकरांना तिथे प्रवेश नव्हता. त्या खोलीची साफसफाई करणे. कागदपत्रेआवरून जागच्या जागी ठेवणे इत्यादि सर्व कामे रत्नाच करीत असे. डॉक्टरांच्या प्रेमळ धाकामुळे इतरांची त्या खोलीत जाण्याची प्राज्ञाच नव्हती. आपल्या मालकाला काय हवे-नको याची पुरेपूर कल्पना फक्त रत्नालाच होती.

एके दिवशी रत्ना असाच काम करत होता. टेबलावरचे कागद नीट जुळवून ठेवत होता; त्यासाठी त्याने एक फाईल उचलली. ती नीट शेल्फवर ठेवायची होती. उचलताक्षणीच 'टप्प' असा आवाज झाला. काहीतरी जमिनीवर पडले! रत्नाने शोध घेतला. फाईल मधील पेन पडून त्याची नीब तुटली होती. ( मित्रांनो. पूर्वी बॉलपेन नव्हते. शाईपेन असत व त्याला लिहिण्यासाठी धातूची नीब असे. )

'आता काय होणार?' रत्ना घाबरला. 'असा निष्काळजीपणा माझ्या हातून कसाकाय घडला? आता साहेब काय म्हणतील?' असे विचार त्याच्या मनात येत होते.

तितक्यात 'मॉर्निंग वॉक' आटोपून डॉ. राजेंद्रप्रसाद सरळ अभ्यासिकेतच आले. काय घडले ते ताबडतोब त्यांच्या लक्षात आले. तुटलेले पेन अजून रत्नाच्या हातातच होते. ते त्यांचे खूप आवडते पेन होते. त्यांच्या एका जवळच्या मित्राने त्यांना ते भेट दिले होते. ते तुटलेलेपाहताच डॉक्टर भयंकर संतापले. ते ओरडले. 'मूर्खा. तोडलेस ना पेन चे नीब? नीट काम करता येत

नाही? जाऽ...नीघ इथून.... अन् उद्यापासून कामावर येण्याची काहीएक आवश्यकता नाही..... जा. '

रत्नाला आधीच अपराधी वाटत होते; त्यातच मालकाकडून अशी जबरदस्त शिक्षा झाल्यावर त्याला रडूच फुटले. तो निमूटपणे घरी निघून गेला.

काही वेळाने डॉ. राजेंद्रप्रसादांना राग शांत झाला. दिवस कामात निघून गेला. रात्री अंथरूणावर पडल्यावर त्यांना सकाळचा प्रसंग आठवला. पेनची नीब तुटली याचे त्यांना वाईट वाटले होते. पण स्वतःचा संताप योग्य नव्हता. असे त्यांना वाटले. ते मनाशी म्हणाले. 'टोपण (झाकण) न लावता पेन मीच फाईलमध्ये ठेवले. फाईलही बंद करून ठेवली. रत्नाला कसे कळणार. आत उघडे ठेवलेले पेन आहे म्हणून? चूक रत्नाची नाही. चूक माझीच आहे. मीच पेन तसे ठेवायला नको होते. मी त्याला उगाचच रागावलो. त्याला मी दुखावले.... '

हे विचार मनात आल्यावर त्यांना झोप येईना व चैनही पडेना. रत्नाला विनाकारण शिक्षा केली. शिक्षा मोठीही होती. त्यांना आपल्या कृतीबद्दल वाईट वाटले च पश्चात्तापही झाला. आपण रागाच्या आहारी गेल्यामुळे असे घडले हे त्यांनी ओळखले. पुन्हा असे रागवायचे नाही व रत्नाला क्षमा करायची असे त्यांनी मनोमन ठरविले. तेव्हा त्यांना थोडे बरे वाटले.

सकाळ होताच त्यांनी काय केले असेल?तर रत्नाला बोलावणे पाठविले. तो भीतभीतच आला. एखाद्या मित्राशी बोलावे तसे राजेंद्रप्रसादांनी रत्नाचे हातहातात घेतले. ते त्याला म्हणाले.

' रत्ना. काल जे काही घडले. त्यात तुझी काहीच चूक नव्हती. पेनची नीब तुटली ती माझ्याच निष्काळजीमुळे. मीच पेन उघडे ठेवले व फाईल बंद केली. मी तुला उगीचच रागावलो. शिक्षा केली तीही नोकरीवरून काढण्याची. माझेच चुकले. मला माफ कर! मी बोललो ते विसरून जा. '

रत्नासारख्या छोट्या माणसाबद्दल डॉ. राजेंद्रप्रसादांनी दाखविलेली आस्था.  त्यांचे मोठेपण सांगून जाते. त्यांना संताप आला व त्याचा परिणाम दुसऱ्याला भोगायला लागला.  याचे त्यांना दुःख झाले. स्वतःमधील दोष दूर करण्याचा त्यांनी निश्चय केला.

रत्नासारख्या नोकरमाणसाजवळ आपली चूक कबूल करण्याचामनाचा मोठेपणा. रत्नाला दाखविलेली क्षमाशीलता हे सर्व गुण राजेंद्रप्रसादांच्या अंगी होते. गुणांनीच माणूस उच्च पदाला पोहोचतो. चूक कबूल करणाऱ्याला प्रथम अहंकार सोडावा लागतो. माणसाला मिळणारे मोठेपण हा त्याच्या अंगच्या गुणांचा गौरव असतो. तुम्हाला या सत्यघटनेवरून बरेच काही शिकायला मिळाले ना?

# एक लघु-चित्रपट

मध्यंतरीदूरदर्शनवर एक लघुचित्रपट (Short-film)पाहिला होता. त्यातलासंदेश चांगला होता. तो चित्रपट एका रेल्वे स्टेशनवर सुरू होतो. खूप गर्दी असलेले रेल्वे स्टेशन. प्रथम कॅमेरा जातो तो प्लॅटफॉर्मवर. कॅमेरा गर्दीतील पायांवर. खूप पाय लगबगीने एका दिशेने जाताहेत. मग कॅमेरा दोन पायांवर झूम होतो. त्याच्या पायात जुन्या सपाता त्यातली एक चप्पल तुटते. कॅमेरावर जातो. एक गरीब मुलगा 12-15 वर्षांचा! अंगात फाटके कपडे. अर्धी चड्डी फाटका शर्ट.

तो खाली वाकून चप्पल हातात घेतो. तसाच जाऊन प्लॅटफॉर्मवरील एका खांबाशी बसतो. चपलेचा पट्टा छिद्रात घालण्याचा प्रयत्न करतो.... प्लटफॉर्मवरील गाडी निघून गेल्यामुळे जरा शांत होतं. पुढची गाडी येणार असते....

तेवढ्यात एक मुलगा. त्याच्याएवढाच. आणि त्याचे आई-वडील प्लटफॉर्मवर येतात् मोकळ्या बाकावर बसतात. गाडीची वाट पाहात. या मुलाचे लक्ष आपसूकच मुलाच्या पायांकडे जाते. नवेकोरे बूट त्याच्या पायात दिसतात. ह्याच्या मनात येत असावं. किती हा भाग्यवान मुलगा! त्याला हवं ते त्याचे वडील घेऊन देत असतील! आणि माझ्या या तुटक्याचपला!

त्या मुलाला आपल्या नव्या बुटांची भारीच काळजी असते. खिशातला रुमाल काढून तो किंचित मळलेले ते शूज पुसतो. जरा एक चक्कर मारून येतो; व परत शूज पुसतो. शूज जरा सैल असावेत. तो ते नीट बसवतो.

हा गरीब मुलगा त्या मुलाच्या सर्व हालचाली कौतुकाने न्याहाळत असतो. कदाचित त्याला मनात हेवा वाटत असावा. मला कधीतरी असे शूज मिळतील का? छेः! शक्यच नाही. पुन्हा तो आपल्या तुटक्या चप्पलकडे पाहतो... अजून ती त्याच्या हातातच आहे....

तेवढ्यात गाडी येते. तो मुलगा व आई-वडील उठतात. एक-दीड मिनिट गाडी थांबते. हे तिघे चढतात. हा गरीब मुलगा त्यांच्या कडेच पाहतो आहे. गाडी चालू होते व थोडा वेग घेते. क्षणभरातच मुलाची आई त्याला आत घेते तेवढ्यात त्याच्या पायातला एक बूट पायातून निघून प्लॅटफॉर्वर पडतो. गरीब मुलगा ते पाहतो. क्षणाचाही विचार न करता तो पळतो बूट उचलतो व त्या मुलाला देण्यासाठी गाडीबरोबर धावतो..... तो मुलगा दांड्याला धरून हे सर्व पाहतो. बूट घेण्यासाठी वाकून हात बाहेरही काढतो.... पणमुलाचा वेग कमी पडतो व तेवढ्यात प्लॅटफॉर्म संपतो. आता काय उपयोग?....

गाडीतला मुलगा आपला दुसरा बूटही पायातून काढतो व धावणाऱ्या मुलाच्या दिशेने फेकतो...! हा मुलगा तो बूट उचलतो.... दोन्ही बूट त्याच्या हातात असतात....

मित्रांनो.  इथेच हा लघुचित्रपट संपतो...!!!

गरीब मुलाला मनात हेवा वाटतो खरा; पण तरीही तो गाडीतल्या मुलाला बूट परत करायला धावतो... मनातील लालसा बाजूला सारूनतो निःस्वार्थीपणे पळतो व बूट त्या मुलाला मिळावा.  असा प्रामाणिक प्रयत्न करतो. त्र दुसरा मुलगा आपल्या नव्या बुटांबद्दल‘पझेसिव्ह’ असूनही आपला दुसरा बूटही फेकून देतो. खाली पडल्यावर दोन्ही बूट त्या मुलाला तरी मिळतील! असा विचार त्या मुलाने केला असावा. म्हणूनच त्याने त्याग केला....

मित्रांनो.  गरीब असूनही लोभ किंवा मोह टाळणारा तो मुलगा; व मला नाही तर त्याला तरी उपयोग होईल हा उदार विचार करणारा तो श्रीमंत मुलगा ..... ! दोघांनीही लहान असूनही चांगले गुण दाखवून आपल्यालाही शिकवण दिली!!

अवघ्या दहा मिनिटांची ही फिल्म फार प्रभावी वाटली. म्हणूनच त्याची गोष्ट तुम्हालाही सांगितली. आवडली नं?

# महात्मा गांधीजी

एकदा महात्मा गांधी एका मोठ्या परदेशी बोटीतून प्रवास करत होते. एका कुठल्यातरी परिषदेसाठी ते इंग्लंडला चालले होते. एकदिवस बोटीच्या डेकवर बसून ते काहीतरी लिहीत होते. त्या बोटीवरच्या प्रवाशांपैकी बरेचसे प्रवासी युरोपियनच होते. काळे-गोरे हा भेद त्यावेळी तीव्रतेने पसरलेला होता.

गांधीजींची मूर्ती पाहून एका युरोपियान माणसाला त्यांची चेष्टा करावीशी वाटली. त्याच्या मनात आले. 'काय हा वेष! अर्धा उघडाच आहे हा माणूस. काय ते टक्कल! डोळयांवरचा तो चष्मा! अगदीच अवतार आहे. त्यातून हा काळा माणूस. हा कशाला निघालाय इंग्लंडला ?

त्या गोऱ्या माणसाने काही कागद घेतले. त्यावर गांधीजींचीच वेगवेगळी चित्रे काढली. काही अर्धी उघडी. काही कुरूप. दात नसलेली. काठी घेतलेला म्हातारा... अशी ती चित्रे होती. शेवटच्या कागदावर लिहिले होते. 'इथूनच परत जा! इंग्लंडला जायची तुझी लायकी नाही. '

ते सर्व कागद जुळवून त्यांना एक टाचणी व्यवस्थित लावून ते कागद स्वतःच गांधींजींच्या हातात दिले. गांधीजी ते पाहू लागले. गालातल्या गालात हसत तो युरोपियन तिथेच उभाहोता. त्याची अपेक्षा होती की 'हा म्हातारा आता संतापेल माझ्याशी भांडायला येईल. सगळयांना आयती मजाबघायला मिळेल. कंटाळवाण्या प्रवासातील थोडा वेळ मजेत निघून जाईल. '

पण झाले उलटेच! गांधीजींनी शांतपणे ती व्यंगचित्रे पाहिली. त्यांच्या चेहऱ्यावर रागाची पुसटशी खूणही नव्हती. त्यांनी ते कागद नीट पाहिले. मग कागदाची टाचणी काढून घेतली व सर्व कागद कचऱ्याच्या टोपलीत टाकून दिले. त्या युरोपियन तरुणाकडे बघून ते म्हणाले.

‘ भल्या माणसा. तू म्हणालास तसे खरेच हे माझ्या उपयोगाचे आहे. मी टाचणीच शोधत होतो; तू वेळेवर मला ती दिलीस. माझी गरज भागवलीस. तुझे शतशः आभार!’

अस्खलित इंग्रजीतील त्यांचे उत्तरऐकून तो तरुण सर्दच झाला. गांधीजींचा शांतपणा त्याला अगदी अनपेक्षित होता. त्यांच्या मृदु आवाजातील उत्तराने तो मनात खजील झाला. कसेतरी त्याने माफीचे शब्द उच्चारले. आणि काढता पाय घेतला.

गांधीजींच्या जीवनातील आणखी एक प्रसंग. तेव्हाही ते प्रवासच करीत होते; पण आगगाडीतून. ते नेहमी तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करत असत. त्यावेळी कुठेही आजच्यासारखी गर्दी नसे. म्हणून गांधीजी एका बाकावर आडवे झाले होते.

एका स्टेशनवरएक गृहस्थ समोरच्या बाकावर येऊन बसले. काहीसे अर्धशिक्षित असावेत ते. गाडी चालू झाल्यावर ते थोड्याशा रागाने व थोड्याशा उपरोधाने गांधीजींना उद्देशून म्हणाले.

‘ हे पाहा आपले हिंदुस्थानी लोक! अडाणी नुसते! जागा दिसली ली खुशाल ताणून देतात.....

तिकडे आपल्या देशाचे काहीही होवो.... यांचे काय जाते? .... इंग्रज तिकडे देश बळकावू बघतो आहे! ..... आणि यांना इथे झोपा काढायच्या आहेत...... एबाबा. ऊठ! शोभतं का तुला हे ?’

त्याकाळी आजच्यासारख्या सोयी नव्हत्या. टीव्ही अजून यायचा होता. वर्तमानपत्रेही फारशी नव्हती. त्यामुळे त्याने गांधींना पाहिलेले नव्हते. त्यामुळेच त्याने गांधीजींनाओखलले नव्हते. त्याचा तोंडाचा पट्टा चालू होता. तो गृहस्थ पुढे गांधीजींना म्हणाला.

'काय रे? तुला काही पत्ता आहे का?देशात काय चालले आहे याचा ? हिंदुस्थानात तुझ्या सारखे काही न करता झोपा काढणारेच लोक जास्त भरले आहेत! तिकडे तो महात्मा बघ. देशासाठी घरदार. संसार सोडून केवढे काम करतो आहे. तो एवढा मोठा आहे. की इंग्रजांना भीती वाटते त्याची. ऐकले आहे का तू त्याचे नाव तरी? आपले महात्मा गांधी! अलाहाबादला मोठा सत्कार आहे त्यांचा. भाषण पण आहे! तिथेच चाललो आहे मी. म्हटले. त्या थोर माणसाचे एकदा दर्शन तरी घ्यावे! आमचा देवच आहे तो....... बाकी तुला सांगून काय उपयोग म्हणा'

असेच कितीतरी तो माणूस बोलत राहिला. गांधीजीं समोर त्यांची निर्भत्सना करीत राहिला. व एकीकडे गांधींची स्तुती करत राहिला.

गाडी अलाहाबाद स्टेशनवर पोहोचली. खूप मोठी गर्दी गांधीजींच्या स्वागतासाठी सज्ज होती. गांधीजींना शोधत लोक त्यांच्या डब्यापाशी आले. त्यांना येतांना पाहून हा गृहस्थ पुन्हा गांधींना म्हणाला.

' पाहिलेस? केवढे लोक जमलेत ते? पूजा करावी असा महात्मा आहे तो. तुलाही आता दिसेल. घे त्याचे दर्शन! बाकी तुला काय म्हणा.... '

त्याचे वाक्य पूर्ण होते न होते तोच लोक गांधीजीं पर्यंत पोहोचले. त्यांनी गांधीजींना हार-गुच्छ दिले. तो मघाचा गृहस्थ शेजारीच उभा होता. तो थिजल्यासारखा झाला होता. त्याच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. तो गांधीजींच्या पायांवर अक्षरशः कोसळला. तो त्यांना माफी करण्यासाठी विनवू लागला. त्याच्या डोळयातून अपराधीपणाचे अश्रू वाहात होते.

गांधीजींनी त्याला उठविले व त्याला मिठी मारली. म्हणाले.

‘ ऊठ! मी अजिबात रागावलो नाही. तू माझ्याबद्दल जो आदर व्यक्त केलास तोच माझ्या लक्षात राहील. देशासाठी काम करण्याची मला प्रेरणा देत राहील. बाकी सर्व तू जे बोललास.  ते मी विसरून जाईन….. ’

गांधीजी खरोखरच महात्मा होते. त्यांनी त्यांना दूषणे देणाऱ्या माणसाला उदार मनाने क्षमा केली.

एखादी व्यक्ती उगीचच ‘मोठी’ होत नसते; तर तिच्या अंगी दुर्मिळ गुण असतात म्हणूनच ती वंदनीय असते!

# पाण्यासाठी दाहि दिशा.
# आम्हा फिरविशी जगदीशा

मित्रांनो. व्यंकटेश स्तोत्रात येणारी ओळ! तिथे पाण्याऐवजी अन्नासाठी असे शब्द आहेत इतकाच फरक. उद्या पाणी येणार नाही म्हटलं की बायकांची तारांबळ! सगळी भांडी त्यांनाच भरावी लागतात. मग त्यावरही विनोद होतात. 'सगळं भरलं का? हे निरांजन राहिलं आहे ना!' किंवा. तुम्ही . गाळणे (चहाचे) भरायचाही प्रयत्न कराल! नाहीतर 'झालं सगळं भरून? आता चूळही भरून ठेवा!' असे विनोद जरा ताण हलका करतात. एवढंच.... शहरापेक्षा गावाकडे तर भीषण परिस्थिती असते. आठवड्यातून दोनदा. किंवा एकदाच असं पाणी मिळतं. विहिरीत उतरून वाटीने पाणी भरण्याची दृष्ये तुम्ही टीवीवर नक्की पाहिली असतील.

राजस्थानात वर वर्णन केल्यासारखी खूप गावे आहेत अल्वार या गावात राहणारा राजेंद्रसिंह नावाचा एक तरुण. 1980 मध्ये त्याने आपले कॉलेजशिक्षण पूर्ण केले व ठाम निश्चयाने तो खेड्यांकडे वळला. लौकरच त्याच्या लक्षात आले. इथला मध्यवर्ती प्रश्न आहे ''पाणी''. मग या तरुणाने गावकऱ्यांशी चर्चा केली. त्यांनाच कामाला उद्युक्त करून मोसमी पावसाचे पाणी साठवण्याची व जिरविण्याची योजना आखली. भाषणांतून अनेक तरुणांनाया कामाचे महत्त्व पटविले. गोपालपुरा या गावात पहिला प्रयोग करण्यात आला. छोटे छोटे बांध ठिकठिकाणी घातले. गावकऱ्यांनी श्रमदान केले. त्यामुळे पावसाचे पाणी अडले. ते दुष्काळी जमिनीत मुरले कोरड्या पडलेल्या विहिरींना पुन्हा पाणी आले. पाण्याची पातळी वाढली.

हळू हळू हे काम अनेक गावात राजेंद्रसिंह यांच्या प्रेरणेने सुरू झाले. आश्चर्य म्हणजे 3000 च्या वरबांध बांधले गेले आहेत सातशे हून जास्त खेडी दुष्काळातून बाहेर काढण्यात यश

आले आहे. तीन नद्यांचे प्रवाह वळवून दुष्काळी भागात नेण्यात आले. राजेंद्रसिंह यांच्या कार्याची दखल घेऊन परदेशाचा 'मॅगसेसे पुरस्कार' त्यांना 2001 मध्ये सन्मानाने देण्यात आला. खरोखर त्यांनी पाण्यासाठी 'भगीरथ प्रयत्न' केले होते.

हा भगीरथ कोण? त्याची पुराणातील गोष्ट पाण्यासंबंधीच आहे. 'इक्ष्वाकु' वंशात अंशुमान नामक राजा होऊन गेला त्याचा पुत्र दिलीप व त्याचा पुत्र भगीरथ. याच वंशात पुढे दशरथ व राम होऊन गेले. मागे जाऊ या. अंशुमान चा आजोबा 'सगर' हा होता. म्हणजे भगीरथाचा खापर-पणजोबा. सगरानेअश्वमेध यज्ञ केला. कोणी यज्ञाचा घोडा अडविला की युद्ध होई. अशी खूप राज्ये सगराने जिंकली. इंद्राला त्यामुळे भीती वाटू लागली. सगराला दिग्विजय मिळू नये.  यासाठी त्याने कारस्थान केले. कपटबुद्धीने घोडा चोरून नेला व कपिल मुनींच्या आश्रमात नेऊन बांधला.

त्यावेळी कपिलमुनी तपश्चर्येला बसले होते. त्यामुळे त्यांना घोड्याबद्दल काहीच माहिती नव्हती. घोड्याचा शोध घेत सगराचे साठहजार पुत्र आश्रमात पोहोचले. घोडा कपिलमुनींनी अडविला असे समजून ते युद्धाला सज्ज झाले. गोंधळामुळेकपिलमुनी तपश्चर्येतून बाहेर आले. त्यांनी डोळे उघडताच सर्व सगरपुत्र भस्मसात झाले. अंशुमानला ही हकीगत समजली. त्यानेमुनींची प्रार्थना केली व विचारले.  'कशाने सगरपुत्र उद्धरतील?काही उपाय सांगा.

कपिलमुनींनी सांगितले.  'स्वर्गातून गंगाभूतलावर आणलीस तरच! गंगेचा प्रवाह त्यांच्या राखेवरून गेला तर त्यांचा उद्धार होईल. ' मग अंशुमानाने तप सुरू केले. आयुष्यभर तप करूनही गंगा प्रसन्न झालीच नाही. पुढे त्याचा मुलगा दिलीप राजा यानेही तप केले पण त्यालाही यश आले नाही. नंतर ही कामगिरी भगीऱ्थाकडे आली.

आपल्या पूर्वजांच्या अपयशावरून धडा घेऊन त्याने खूपच उग्र तप केले. गंगा अखेरी प्रसन्न झाली. पण तिचा प्रवाह इतका वेगवान होता की ती स्वर्गातून कोसळताच पाताळात गेली

असती. गंगा भगीऱ्थाला म्हणाली.  ‘ तू शंकराला प्रसन्न करून घे; त्यांच्याशिवाय कोणीही माझा प्रवाह सोसू शकणार नाही

झाले!! भगीरथाने पुन्हा उग्र तप केले. शंकर प्रसन्न झाले.  गंगेचा प्रवाह जटेत घेऊन त्यांनी तो सौम्यपणे सोडून दिला. आतागंगा व भगीरथ कपिलमुनीं च्या आश्रमाकडे निघाले. वाटेत हिमालय पर्वत होता. तिथे जन्हु नावाचे ऋषी यज्ञ करत होते. त्यांची यज्ञभूमीच वाहून गेली. म्हणून रागाने त्यांनी तो प्रवाह पिऊनच टाकला. भगीरथापुढे नवीन संकट उभे राहिले. पण तो खचला नाही. त्याने जन्हू ऋषींची दीर्घकाळ प्रार्थना केली. त्याच्या मनधरणीमुळे प्रसन्न होऊन जन्हु ऋषींनी आपल्या कानामधून गंगेला वाट करून दिली. म्हणूनच तिचे नाव जान्हवी असे पडले. मग गंगेला घेऊन भगीरथ कपिलमुनींच्या आश्रमात पोहोचला. आपल्या पूर्वजांच्या राखेवरून जाण्याची त्याने गंगेला विनंती केली. शेवटी सगरपुत्रांवा उद्धार झाला.

कितीही अडथळे आले तरी भगीरथाने कष्टाने त्यांच्यावर मात केली व आपला चांगला हेतू साध्य केलाच. म्हणून अविश्रांत प्रयत्नकरण्याला ‘भगीरथ प्रयत्न’ म्हटले जाते. आजच्या युगात पाण्यासाठी असाच प्रयत्नांची गरज आहे. भले उद्देश वेगळा का असेना!

आपली पृथ्वी पाण्याने वेढलेली आहे. जमीन फक्त तीस टक्के व पाणी सत्तर टक्के! क्षणभऱ वाटते की पाणी मुबलक आहे. पण तो भ्रम आहे! कारण पृथ्वीवरील पाण्यापैकी97 टक्के पाणी खारे पाणी आहे ; उरले तीन टक्के गोडे पाणी. त्यापैकीही दोन टक्के पाणी बर्फ स्वरूपात आहे. आता फक्त एक टक्का पाणी उरले.

यातच सबंध जग वाटेकरी. सर्व जगातील शेती.  कारखाने. माणसाचे पिण्याचे पाणी …सगळं सगळं भागवलं पाहिजे. प्राणीझाडांची गरज सुद्ध् त्यातूनच! आताकळले ना? पाणी जपूनच वापरायला हवे. नाहीतर ति एक प्रदर्शनातील वस्तू होऊन जाईल. व मानव जात.  सर्व जीवनच पृथ्वरून नष्ट होऊन जाईल. चला जससाक्षर होऊ या. प्रयत्न केला तर काहीच अशक्य नाही हे भगीरथाने दाखवून दिलेच आहे.

# महान पराक्रमी शिवाजी

शिवाजी महाराजांचे नाव माहीत नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. शिवाजी चे वडील शहाजीराजे मोठे पराक्रमी व मुत्सद्दी होते. त्यांनाही मोगलांच्या सत्तेची चीड होती आणि स्वराज्य स्थापण्याची इच्छा होती. दुर्दैवाने त्यांचा सहवास शिवाजीला फारसा मिळाला नाही. बालपणात त्याच्या शिक्षणाचे व त्याच्या आयुष्याला वळण लावण्याचे काम त्याची दूरदर्शी व धोरणी आई जिजा बाई हिने केले. तसेच हुषार. करारी व एकनिष्ठ कारभारी दादोजी कोंडदेव यांनी केले.

शहाजीराजे आदिलशहाकडे तर कधी मोगलांकडे सरदारकीकरत होते. त्यांनी एकदोन वेळा स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यात त्यांना यश आले नाही. ते आदिलशहाच्या पदरी सरदार होते व पुण्याची जहागिरी त्यांच्याकडे वडिलोपार्जित चालत आलेली होती. जिजाबाईचे वडील निजामशाहीकडे सरदार होते. एकदा बादशाह निजामशहा ने जिजाबाईंचे वडील व तीन बाऊ यांना कपटाने ठार मारले. त्यामुळे शहाजीराजांना चीड आली.

यावनी सत्तधीश हिंदू सरदारांना असे अनेकवेळा ठार मारत असत. त्यामुळे. यापुढेमुसलमानी सत्ताधीशांकडे चाकरी करायची नाही आणि स्वतंत्र राज्य स्थापन करायचे. असे शहाजी राजांनी ठरविले. ते पुण्याला आले. पुण्याची जहागिर त्यांचीच होती. ती विजापूरच्या आदिलशहाच्या सत्तेखाली होती. शहाजीराजांनी बंड पुकारले. त्यांनी आपली जहागीर स्वतंत्र असल्याची घोषणा केली. त्यामुळे सर्वत्र धामधूम . लढाया . हल्ले-प्रतिहल्ले सुरू झाले. अशा परिस्थितीत जिजाबाईला दिवस गेलेले होते. शहाजीराजांनाजिजाबाईंच्या जिवाची चिंता होती. तिचे माहेर उद्ध्वस्त झालेले होते. तिला माहेरी जाता येणे शक्य नव्हते.

म्हणून शहाजीराजांनी जिजाबाईला शिवनेरी किल्ल्यावर ठेवण्याचे निश्चित केले. शिवनेरी सुरक्षित होता. विजयराघव हा तेथील किल्लेदार होता. तो शहाजी राजांच्या नात्यातील व विश्वासू होता. शहाजीराजांनी जिजाबाईंनाशिवनेरीवर पोहोचते केले. तिला सोबतीला आपले विश्वासू सरदारठेवले व ते पुढे मोहिमेवर निघून गेले.

जिजाबाईला शुक्रवार दि. 19 फेब्रूवारी 1630 रोजी मुलगा झाला. शिवनेरीवर सर्वांनाच आनंद झाला. शिवनेरीवर सर्वांना साखर आणण्यातआली. तोफा उडविण्यात आल्या. शिवनेरीवर मुलाचा जन्म झाला म्हणून जिजाबाईने. मुलाचे नाव शिवाजी ठेवले. शिवाजीचा जन्म झाला त्यावेळी शहाजीराजे दक्षिणेत पराक्रम गाजवीत होते. दर्याखानचा पराभव करून ते शिवनेरीवर आले. त्यांनी प्रथमच मुलाला पाहिले. त्यांना अतीव आनंद झाला.

शहाजीराजांनी पुत्रजन्माच्या निमित्ताने खूप दानधर्म केले. नंतर ते पुन्हा मोहिमेवर निघून गेले. शिवाजी शिवनेरीवर मोठा होत होता. शिवाजीच्या बाललीला पाहण्यात जिजाबाई मग्न होती. ती त्याला रामायण-महाभारतातील वीरांच्या शौर्याच्या गोष्टी सांगत असे. त्याच्या बालमनावर ती चांगले संस्कार करत होती. मावळयांच्या मुलांबरोबर शिवाजी लुटूपुटीची लढाई खेळत असे. शिवनेरीच्या किल्ल्यात शिवाजीचे बालपण जात होते.

दादोजी कोंडदेवाने शिवाजीच्या शिक्षणाची चांगली व्यवस्थाकेली. त्याला तलवार. दांडपट्टा फिरवायला शिकविले. भालाफेक शिकविली. शिवाजी घोडदौड करू लागला. लांबलांबच्या प्रदेशात तो घोडदौड करून येत असे. आपल्या सवंगड्यांबरोबर तो दऱ्याखोऱ्यात फिरत असे. त्याने आसपासची सर्व तीर्थक्षेत्रे पाहिली साधुसंतांचे दर्शन घेतले.

दादोजी कोंडदेवांबरोबर तो बारा मावळ हिंडला ; त्याने डोंगरांची. चोरवाटांची. किल्ल्यांची. आडमार्गांची. खिंडींची. जंगलांची ओळख करून घेतली. सर्व प्रदेशाची त्याने स्वतः फिरून पाहणी केली. शिवाजीने बेचिराख झालेली गावे पाहिली. देशमुख. वतनदार. पाटील

वगैरेंनी लोकांवर केलेले अत्त्याचार पाहिले. देशात धर्माला.  स्त्रीच्या अब्रूला व लोकांच्या जीविताला किंमत उरली नाही.  असा त्याला अनुभव आला.

शिवाजी लहान असला तरी समजुतीने मोठा होता! त्याच्या मनात परकीय सत्तेबद्दल चीड निर्माण झाली. ही गुलामगिरी झुगारून देऊन स्वराज्याची स्थापना करावी.  असे विचार त्याच्या मनात निर्माण होऊ लागले. शिवाजी हळू हळू मोठा होत होता. जिजाबाई प्रजेचे न्यायदान स्वतः करीत असे. शिवाजी तिच्याबरोबर न्यायदानाला बसत असे. आईने व दादोजी कोंडदेवांनी प्रजेची गाऱ्हाणी कशी ऐकली.  त्यांची दुःखे कशी दूर केली.  हे तो लक्षपूर्वक पाहात व ऐकत असे.

शिवाजीने आत्तापर्यंत बरेच पाहिले व अनुभवले होते. मोंगलांचीसत्ता आता त्याच्याडोळयात खूपू लागली होती. त्याने मावळयांची तरुण मुले गोळा केली. अनेक जिवलग स्नेही मिळविले. ते सर्वजण एकत्र जमून स्वराज्याचे मनसुबे रचू लागले. शिवाजीशी एकनिष्ठ राहन्याच्या शपथा घेऊ लागले.

एकदिवस शिवाजी व त्याचे सवंगडी भोर तालुक्यातील रायरेश्वराच्या मंदिरात जमले. रायरेश्वर हे स्वयंभू शिवलिंग आहे. त्याच्यासमोर शिवाजीने व त्याच्या सवंगड्यांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. तेव्हापासून शिवाजीने रायरेश्वराच्या पूजेची व्यवस्था केली. शिवाजीची महादेवावर आणि भवानीमातेवर अपार श्रद्धा होती.

शिवाजी धर्म-निरपेक्ष होता; सर्व धर्मांतील साधुसंतांना तो मान देत असे. स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली तेव्हा तो केवळ बारा वर्षांचा होता. त्याचे स्वराज्यस्थापनेविषयीचे विचार आता पक्के झाले होते. पण त्याकरिता सुरक्षितता पाहिजे होती. त्याकरिता एखाद्या मजबूत किल्ल्याची आवश्यकता होती. तेव्हा शिवाजीने उंच व सुरक्षित असा तोरणा किल्ला आपपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले. तो किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता.  पण त्याकडे त्याचे फारसे लक्ष नव्हते. एक दिवस शिवाजी व मावळे तोरणा किल्ल्यावर चढले. तेथे त्यांनी 'हरहर महादेव'

अशी घोषणा करून किल्ला ताब्यात घेतला. तेथे आपले चौकीदार बसविले; आणि स्वातंत्र्याचा भगवा झेंडा फडकविला! तोरणा हे नाव बदलून त्याचे ‘राजगड’ हे नाव ठेवले. स्वराज्यस्थापनेची सुरुवात अशा रीतीने झाली. या वेळीशिवाजीचे वय होते फक्त पंधरा वर्षे! इतक्या लहान वयात तयाने स्वराज्याचे स्वप्न पाहिले व ते प्रत्यक्षातही आणले.

लौकरच शिवाजीने मोंगलांची सत्ता झुगारून देऊन स्वराज्याची स्थपना केली. तीनशे वर्षे महाराष्ट्रभर सत्ता गाजविली. असा इतिहास मोठा आहे. मित्रांनो तुम्ही शिवचरित्र नक्की वाचा. ‘शिवाजीसम आदर्श राजा होणे नाही’ . असे का म्हणतात ते तुम्हाला त्या शिवचरित्राच्या वाचनाने कळेल.

# सर्कसवाले देवल

मुलांनो.  तुम्हाला लहानपणी चिऊ-काऊच्या गोष्टी आवडायच्या. थोडं मोठं झाल्यावर वाघसिंहांच्या गोष्टीही तुम्ही मन लावून ऐकायचात. आज हे प्राणी तुम्ही टीव्हीवर वेगवेगळया चॅनलवर बघू शकता. पण पूर्वी अशी सुविधा उपलब्ध नव्हती. सगळीकडे टीव्ही 1975.  किंबहुना त्यानंतरच आला. व इतर चॅनल त्याहूनही उशीरा आले. वाघसिंह बघायला मुलांना जंगलात जावं लागायचं का? नाही; त्यावेळी गावात सर्कस यायची व सर्कशीत या प्राण्यांचे खेळ पाहता यायचे. हे फार मोठं आकर्षण त्यावेळी होतं. लहानपणी सर्कस पाहिली नाही असा माणूस त्यावेळी सापडणं अवघड होतं. अजूनही सर्कसचं मनोरंजन चालू आहे. तुम्ही व तुमच्या पालकांनी पाहिली आहे का?रात्रीच्या वेळी आकाशात गोल गोल फिरणारा सर्च लाईट आकाशात दिसला की गावात सर्कस आली असे कळते. तीच त्यांची जाहिरात असते.

अशीच एका गावात सर्कस आली होती त्याचीच ही कथा. प्रसंग आहे सर्कशीतील रिंगणातला. सुमारे ऐंशी वर्षांपूर्वीचा. रिंगणात विविध खेळ चालू होते. तंबू प्रेक्षकांनी गच्च भरला होता. रिंगमास्टर कसरतीच्या खेळावर देखरेख करत होते. एक खेळ संपून दुसरा सुरू होणार होता. तेवढ्यात गडबड झाली. गॅलरीत फळीवर बसलेला एक तरुण प्रेक्षक उभा राहिला व मोठ्यांदा ओरडून रिंगमास्टरना म्हणाला.

‘अहो.  ही काय सर्कस आहे? का डोंबाऱ्याचा खेळ आहे?’ तंबूमध्ये एकदम शांतता पसरली. तो तरुण पुढे म्हणाला.

‘चांगले खेळ दाखवा; नाहीतर तिकिटाचे पैसे परत करा..... ’

तोपर्यंत स्वयंसेवक त्या तरुणापाशी पोहोचले होते. ते त्याला बाहेर हुसकून देण्याच्या प्रयत्नात होते. पण रिंगमास्टर त्यांना म्हणाले.

'थांबा!' मग त्या तरुणाला उद्देशून म्हणाले. 'आमचे खेळ चांगले नाहीत. हे सिद्ध करून दाखवा. तसं केलं तर तिकिटाचे पैसे तर देऊच; पण या खेळाचं उत्पन्नही आम्ही तुम्हाला देऊ. बक्षीस म्हणून! आहे तयारी?'

यावर तो तरुण म्हणाला. 'हो. हो;मी स्वतः यापेक्षा चांगले खेळ करून दाखवू शकतो. '

रिंगमास्टर म्हणाले. 'तर मग या रिंगणात. ' हे सर्व संभाषण लाऊड स्पीकरवरून प्रेक्षकांना ऐकू येत होते.

आत्तापर्यंत तंबूत निर्माण झालेला तणाव थोडा सैल झाला. सगळ्या प्रेक्षकांनी श्वास रोखून धरले. आता पुढे काय होते. अशा उत्सुकतेने ते सावरून बसले. तो तरुण रिंगणाकडे चालू लागला. तंबूत शांतता पसरली. रिंगमास्टरांनी आपला चाबूक फटकारला. त्याबरोबर एक अबलख घोडा फुरफुरत आला व रिंगणात गोल चकरा मारू लागला. रिंगणात येताक्षणीच त्या तरुणाने लांबूनच घोड्यावर अचूक उडी मारली. घोड्याने वेग वाढवला. तो तरुण घोड्यावर स्वार झाला. त्यावर उभा राहिला. अंगातील वरचे कपडे उभ्याउभ्याच काढून टाकले. आतील झगमगीत पोशाख पाहून सर्वांनी टाळ्या पिटल्या.

तेवढ्यात तरुणाने फिरत्या घोड्यावरून जमिनीवर उडी मारली. पुढच्याच क्षणी तो पुन्हा घोड्यावर स्वार झाला व कसरती करू लागला. तोल साधण्याच्या कसरती. यालाच 'बॅलेंन्सिंग' म्हणतात. प्रेक्षकांनी टाळयांचा कडकडाट केला. काही वेळाने त्या तरुणाने आपला खेळ थांबविला. तो रिंगमास्टरच्या जवळ येऊन उभा राहिला. त्यांनी विचारले. 'आणखी काय येतं तुम्हाला?'

तो म्हणाला. 'जगलिंग' जगलिंग म्हणजे सात-आठ टोप्या किंवा बशा एकएक हवेत उडवायच्या व झेलत रहायच्या. 'आणखी?' असे विचारताच त्या तरुणाने दोन-चार कोलांट्या

उड्या मारल्या. अंगातील झगमगीत पोशाख काढून टाकला. तेव्हा अंगावर होता रंगीबेरंगी. चित्रविचित्र गबाळा कुडता आणि सैलसर पायजमा! ही सगळी कृती त्याने अतिशय झटपट केली. त्याचबरोबर तो विदुषकी चाळे करू लागला. प्रेक्षकातून हास्याचे फवारे उसळू लागले.

रिंगमास्टरांनी शाबासकीसाठी तरुणाची पाठ थोपटली. तो तरुण (विदूषक) खोटे-खोटे रडू लागला व रिंगणात फिरून प्रेक्षकांना सांगू लागला. ‘ बघा हो ; मला मारलं यांनी.... ऽ ‘

तो विदूषकी थाट पाहून प्रेक्षकांनी हसून तंबू डोक्यावर घेतला. नंतर तो तरुण रिंगमास्टरजवळ येऊन उभा राहिला. थोडी शांतता झाल्यावर रिंगमास्टरांनी जाहीर केले;

‘आम्ही खूष झालो आहोत. ‘आजच्या खेळाचं उत्पन्न आम्ही या तरुणाला देत आहोत!’

प्रेक्षकांनी पुन्हा टाळयांचा कडकडाट केला. आपली पसंती व्यक्त केली. रिंगमास्टरांनी तरुणाला विचारले. ‘तुमचं नाव पत्ता कळेल का प्रेक्षकांना ?’

‘मी काशीनाथ ऊर्फ बंडोपंत देवल या रिंगमास्टर विनायकराव देवल यांचा धाकटा भाऊ. मुक्काम ... देवल सर्कस!’

प्रेक्षकांना आश्चर्याचा व आनंदाचा धक्का बसला. त्यांनी उभे राहून खूप वेळ टाळया वाजवल्या!असे होते देवल-बंधू. त्यांची देवल सर्कस जगभर गाजली. इंग्रज व रशियन सर्कशीचा तो काळ होता. त्या स्पर्धेच्या काळातही देवल सर्कसचा झेंडा साता समुद्रापार गेला!

बंडोपंतांचे काका व्यंकटराव देवल. त्यांनीच देवल-सर्कसची स्थापना केली. देवल कुटुंब म्हैसाळ या गावचे. महाराष्ट्रात मिरजेपासून दहाबारा किलोमीटरवर हे गाव आहे. शंभर वर्षांपूर्वी तर ते एकदम खेडे गाव होते. म्हैसाळ हे सर्कसचे गाव म्हणूनच ओळखले जायचे. प्रत्येक

घरातील एकतरी माणूस सर्कशीत असायचा. मराठी माणसांना घेऊन काढलेली ही पहिली सर्कस! म्हणून तिला अधिक मानाचं स्थान होतं.

आपणही सर्कसमधे काम करायचे.  असे लहानपणीच बंडूने ठरविले होते. पण त्याचवेळी एक अडचण उत्पन्न झाली. सहा-सात वर्षांचा असतांना पळता पळता पडल्याचे निमित्त झाले व गुढघ्याचे गंभीर दुखणे सुरू झाले. शाळेतही कोणीतरी उचलून न्यावे लागे! पण तेवढ्या लहान वयातही मनात जिद्द कायम होती. बरेच वैद्यांचे उपचार होऊनही उपयोग होत नव्हता. सुदैवाने केवळ नियमित भरपूर आहार व व्यायाम यांनी प्रकृती सुधारली. अकराव्या वर्षी बंडू सर्कशीत दाखल झाला. काकांची कडक शिस्त यामुळे व्यक्तिमत्त्वाची जडण घडण झाली.

मालकाचा पुतण्या असला तरी वेगळी वागणूक नव्हती. दोरी-खिळे ठोकण्यापासून प्राण्यांना मांस देण्यापर्यंतसर्व कामे करावी लागत. काकांनी प्राण्यांवर मुलाप्रमाणे प्रेम करायला शिकविले.

देवल सर्कस हे एक कुटुंबच होते. व्यंकटरावांची सर्कस पाहून लोकमान्य टिळकही खूष झाले होते. त्यांनी व्यंकटरावांना‘सर्कससिंह’ हा किताब दिला. (नारायणराव राजहंस यांना बालगंधर्व हा किताबही टिळकांनीच दिला होता!)

काकांच्या मार्गदर्शनाखालीच बंडोपंत तयार झाले. पुढे ते सर्कसचे मालकही झाले. भारतात पहिली सर्कस निर्माण केली विष्णुपंत छत्रे यांनी पण नावारूपाला आणली ती देवलांनीच. त्यांनीच भारतीय सर्कसला जगभर कीर्ती मिळवून दिली.

बंडोपंतांनी आपले आयुष्य सर्कसलाच वाहून घेतले होते. त्यांचे सारे आयुष्यच रिंगणात गेले. वेगवेगळ्या कसरती.  विदूषकाच्याकरामती व जगलिंग या खेळात ते निपुण होते. मालक म्हणूनही त्यांनी देवल सर्कसची जबाबदारी उत्तम पार पाडली.

एखाद्या क्षेत्रात काळावर ठसा उमटविणाऱ्या व्यक्ती थोड्याच असतात. बंडोपंत देवल हे त्यापैकी एक होते. 16 डिसेंबर 2000 या दिवशी ते काळाच्या पडद्याआड गेले. मात्र सर्कसच्या क्षेत्रात असलेले त्यांचे ठळक नाव काळालाही पुसता येणार नाही. 'सर्कशीच्या रिंगणात' हे त्यांचे आत्मचरित्र जरूर वाचा; म्हणजे तुम्हाला बंडोपंतांच्या अंगच्या इतरही गुणांची ओळख होईल. व सर्कसचं जग कसं असतं हेही कळेल. तुमच्या गावात कधी सर्कस आली तर जरूर पाहा. कसरती. झोक्यावरील साहसाचे खेळ पाहून तुम्ही अचंबित व्हाल. हल्ली प्राण्यांचे खेळ मात्र सर्कशीत नसतात. प्राणी-संरक्षण कायद्याखाली त्याला बंदी आहे. तेही बरोबरच आहे! पण तरीही सर्कस हे उत्तम मनोरंजन आहे यात शंका नाही. त्यामुळे त्यातील कलावंतांना रोजगार मिळतो. हाही एक दृष्टिकोन आहे.

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो. एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail. com

www. esahity. com

एक प्रसन्न अनुभव